म. ग्रं. सं.

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

चंद्र

ीत

# गेरी नाटक.

ते ५.

क,

गणेश बेडकर

तयार केलें.

ी कंपनीनें

विकत घेऊन

ईत

णाजी " प्रेसमध्यें

सिद्ध केलें.

शके १८२१.

आठ आणे.



संगीत

# चंदनमलियागिरी नाटक.

अंक १ ते ५.

हें पुस्तक,

रा. रा. जगन्नाथ गणेश बेडेकर

यांनीं रचून तयार केलें.

तें

## पुरंदरे आणि कंपनीनें

सर्व हक्कासह विकत घेऊन

मुंबईंत

" गणपत कृष्णाजी " प्रेसमध्यें

छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९९, शके १८२१.

किंमत आठ आणे.

सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यांनीं आपलेकडे ठेविले आहेत.

संगीत

# चंदनमलियागिरी नाटक.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

नान्दी.

पद. ( हें वंदन मम० )

चिंतुनि प्रेमें चिंतामणिला ॥ तदनंतर नमि विधितनयेला ॥ धृ० ॥ अज्ञानालय केवळ मी जनीं ॥ कवन करावें येई निजमनीं ॥ इच्छा व्हावी सफल ह्मणोनी ॥ प्रार्थितसें त्या भगवंताला ॥ १ ॥

पद. ( होईल कलह० )

श्रीगुरु तुह्मां सकलां ॥ संतत देवो अखिलशिवाला ॥धृ० ॥ गदारि-दरकरिं बहुतचि विलसे ॥ पदाब्जरज अघनग खंडितसे ॥ भूत पिशाच्च गणांला ॥ नामस्मरणें कांपवि महिला ॥ १ ॥ औदुंबर छायीं करी वसती ॥ भक्तगणां घेवोनि सभोंती ॥ पाजित ज्ञान-सुधेला ॥ नेवो अंतीं विमल पदाला ॥२॥

सूत्रधार०—( पारिपार्श्वकांस. ) झालें इतकें ईश्वरस्तवन पुरे. आतां तुह्मीं पुढील कार्याच्या तजविजीकरितां जा. ( पारिपार्श्वक जातात. सूत्रधार पुढें होऊन. ) हे मत्प्रियरसिकजनहो.—

### साकी.

आजवरी बहु श्रेष्ठ कवींनीं नाटयग्रंथ रचोनी ॥ विद्वज्जन-
समुहा तोषविलें अद्भुतकृति दाऊनी ॥ इर्षा येइ मनीं ॥
सुखवावे बुध निजकवनीं ॥ १ ॥

तेव्हां माझ्या या कृतीचा हंसक्षीरन्यायानें स्वीकार करावा एवढी प्रार्थना आहे. ( पडद्याकडे पाहून ) प्रिये ! अंतर्गृहांतील कार्य संपलें असल्यास अगोदर इकडे ये पाहूं.

नटी०—( प्रवेश करून. ) प्रियकरा ! दासी सेवेंत तत्पर आहे. पण—

### कामदावृत्त.

कार्य कोणतें स्वमनिं योजिलें ॥ ह्मणुनि प्रियकरा इजसि बा-
हिलें ॥ या क्षणीं वदा सिद्ध जाहलें ॥ सुलभ कीं असो वा-
चुगें भलें ॥ १ ॥

सूत्र०—( स्वगत. ) माझ्या स्त्रियेसारखी पतीच्या आज्ञेंत वागणारी दुसरी स्त्रीच मिळावयाची नाहीं. ( उघड ) प्रिये ! तुला कशासाठीं बोलाविलें होतें तें सांगतों ऐक.

### साकी.

चंदनमलियागिरि नामक म्यां नूतन नाटक केलें ॥ संगीतीं
तत्प्रयोग पहाया यांसि निमंत्रण केलें ॥ उत्सुक होऊनी ॥
जनहे बसले बधसुगुणी ॥ १ ॥

नटी—प्राणनाथ ! आपल्या निमंत्रणाचा आदर करून सर्वजन आले हें योग्यच झालें. पण—

सूत्रधार०—पण काय ?

पद. ( वैशाखमासिं० )

मुळिं नाहिं मान नाटय-कृतिस जगतिं राहिला ॥ निंदिताति सर्वथैव जन पहा तिला ॥ धृ० ॥ अति निंद्य हाच ह्मणति कला दूषिती इला ॥ मग व्यर्थ काल काय ह्मणुनि गमवितां मला ॥ बहु यत्न करुनि काय लाभ होय तुह्मांला ॥ एकमनें झटुनि करूं प्रपंच आपुला ॥ १ ॥

सूत्र०—अशी नाटयकलेची स्थिति झाली आहे खरी ! पण तुला यांतलें कारण नाहीं ठाऊक.

नटी—तें काय ? खरंच नाहीं मला कळलें.

सूत्र०—खरेंचका ऐक तर.

साकी.

दुर्व्यसनी ज्यां जगीं बोलती वडील बंधू माता ॥ विद्येचा ज्यां गंधहि नसतो त्यांकारिंही अवचीता ॥ गेली नाटचकला ॥ ह्मणोनि आली या स्थितिला ॥ १ ॥

समजलीस आणखी आतां मी जें नाटक करणार आहे तें आबाल-वृद्धांस आवडण्यासारखें आहे.

नटी—ह्मणजे त्यांतील कथाभाग तरी काय आहे ?

सूत्रधार — साकी.

विधिलेखन तें नटळे कोणा राव असो कीं रंक ॥ इच्छामात्रें भूपतिलाही करील जगतीं खंक ॥ दैविक खेळ पहा ॥ अद्भुत आहे कैसा हा. ॥

याकरितां चल आपण पुढील कार्याकरितां जाऊं. ( जातात. )

## प्र० २ रा.

( विदूषक एकटाच प्रवेश करितो. )

**विदूषक** ( प्रवेश करून. )—

कटाव.

**चरित्र ऐका या शूराचें ॥ रणीं पराक्रम केले कैचे ॥ राज्यावरतीं अरिष्ट आलें ॥ वृत्त मला हें घरींच कळलें ॥ चंबु गवाळें मी आटपलें ॥ मुकटा लोटा घट्ट बांधिला ॥ सोटा आपुला जवळिं घेतला ॥ मग पत्नीला हांक मारिली ॥ हळूच कानीं गोष्ट कथियली ॥ मी जातों संग्रामाला ॥ तयारी करूं लाग मजला ॥ १ ॥ प्रवासिं न मिळे अन्न खावया ॥ लाडु क्षीर ही लांब शेवया ॥ शक्ति न राहिल मार्ग क्रमाया ॥ ह्मणून विचार ऐसा केला ॥ कांहीं तरी घ्यावें खायाला ॥ पोहे घेतले दोन पायली ॥ वडे घारगे मिरची ओली ॥ लोण्याचा वरि घेऊनी गोळा ॥ झालों स्वार पहा ते वेळां ॥ सर्व व्यवस्था केली घरची ॥ झाली तयारी रणीं जाण्याची ॥ इतुक्यामध्यें बार जाहला ॥ पंच्या माझा फिटुं लागला ॥ सर्वांगीं मम कंप सुटला ॥ काय सांगुं हो तुह्मांला ॥ मज सम वीर जगीं विरळा ॥ १ ॥**

चला. " ज्याचें काम त्यानें करावें " आह्मांला हव्यात कशाला त्या पंचाइती. असो. आह्मी जरी महाराजांबरोबर गेलों नाहीं तरी देवाजवळ रडून रडून अगदीं कल्होळ केला. तेव्हां महाराजांना त्या जयसिंगाबरोबरच्या लढाईंत जय झाला. तर आतां दरबारांतच जावें, कारण

लढाईत ज्यानीं ज्यानीं मर्दुमकी केली त्यांना त्यांना पोषाख व अलंकार देण्यांत येणार आहेत. आतां मी लढाईतून पळून आलों ह्मणून काय झालें ? पण शत्रूच्या छातीवर पाय द्यावयाला ह्यात तर आहें. चला तर ! असलीं कामें ह्मणजे दिरंगाईवर टाकून उपयोगाचीं नाहींत. नाहींतर सरेंच ऑफस व्हावयाचें.

---

## प्रवेश ३ रा.

( स्थळ— चंदन राजाचादरबार. )

चोपदार०

पद ( झंपा. )

घोर रणकंदना करुनियां पाठवी ॥ प्रबल अरि जो स्वयें
कालसदनीं ॥ धृ० ॥ अन्यधर्मावरी लुब्ध होती तयां ॥ नित्य
रमताति त्या त्यजुनि माया ॥ चंड दंडा करी चरर कंठा-
चिरी ॥ येतसे भूप जणुं भानु उदया ॥ तिमिरनाशा करी
तेविं रिपु संहरी ॥ गाजवी नाम जगिं श्रेष्ठ राया ॥ १ ॥

( राजाधिराज चंदन राजा सायुध प्रवेश करितो. सर्व सरदार मंडळी त्रिवार मुजरे करून राजानें सांगितल्यावरून आपआपल्या स्थानीं बसतात. )

चंदन—सर्व सरदारहो, आज तुह्मीं माझ्याबरोबर साह्य करून जें यश संपादन केलें त्याबद्दल तुह्मां सर्वांचें मी अत्यानंदानें अभिनंदन करितों.

रणसिंह०—महाराज, आपल्या राजाला पित्यासारखा मानणें हेंच खऱ्या शूर सेवकांचें कर्तव्यकर्म आहे, फार काय सांगावें.—

पद. ( वायुनंदन करुनि० )

अमित सेना प्रबल अरिची केली जर्जर या करें ॥ मोद वाटे मानसीं बहु सुयश भालें प्रभुवरें ॥ प्राण जरि नृपकार्मी गेले खेद नाहो लवबरें ॥ क्षात्रबीजा कधिं न लावूं दुष्कलंका प्रभुवरें ॥ १ ॥

चंदन—काय सांगावें, तुमच्या तोंडून ही निराभिमानाचीं भाषणें श्रवणीं पडतात, तों तों आनंदाला पारावार नाहींसा होऊन सागराच्या जलाप्रमाणें लहरीवर लहरी येतआहेत.

प्रधान—सरकार त्या जयसिंग राजाचा पाडाव होऊन विजयश्रीनें अखेरीस आपल्यालाच माळ घातली ह्मणून सर्व शहरभर आनंदोआनंद होऊन गेलेला आहे

चंदन०—अहो प्रधानजी तुह्मांला काय सांगूं ?

साकी.

राजनिष्ठ तुह्मि सकल ह्मणोनी हर्ष मनातें होई ॥ परचक्राची भीति लेश ही स्वप्निं न माझ्या येई ॥ राज्यस्तंभ पहा ॥ मंत्री जन अवघे आहा ॥ १ ॥

आतां सर्वत्रांना हारतुरे देऊन बक्षिसें वांटा. (सर्वत्रांना बक्षिसें वांटतात.)

चोपदार०—( प्रधानजीस ) प्रधानजी, नृत्यगायनकलेंत प्रवीण अशी वारांगना आलेली आहे. जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें.

प्रधान—कांहीं चिंता नाहीं. बोलीव तिला आंत !

( वारांगना येते ) राजास मुजरा करून उभी राहते. )

विदूषक०—हें पहा, अहो, आपल्या ह्याजी. आतां तंबोऱ्याच्या तारा

तोडण्यांत, आणि तबल्याच्या वाद्या ओढण्यांत वेळ घालवूं नका. एकदां काय आहे तुमच्या अंगांत गुण तो दाखवा.

पद. ( भाग्यवान हा. )

मनमोहन हा राजा चंदन ॥ शशिवदनापरि शोभे आनन ॥ धृ० ॥ रविसम ज्याची सतेज कांती ॥ बघतां दिपती खचितचि लोचन ॥ १ ॥ रत्नमुगुट शिरीं शोभा दे अति ॥ वर्णन करितां कुंठित कविगण ॥ २ ॥

पद. ( याचा वदन. )

मनीं असे बहु दया क्षमा शांती ॥ चिरसुख होवो पौरजनाला त्यजीन नयनीं ती ॥ धृ० ॥ महदपराधी चरणीं शरण जरी निर्भय करि जगतीं ॥ भूप असावा प्रभो हाचिरे नभीं शशी गभस्ती ॥ २ ॥

चंदन—वाहवा! कितीतरी मधुर हें गायन आहे प्रधानजी! को-णत्या देशांत वास्तव्य करणारी ही आहे बरें. !

वारांगना—आपल्याच दयाळु छत्राखालीं सुखानें कालक्षेप करणारी एक बटीक आहे.

विदूषक—कां प्रधानजी! आमचें गाणें तुह्मीं ऐकलेंच आहे; मग सांगा पाहूं आमच्या गाण्यांत आणि या गाण्यांत काय अंतर आहेतें?

प्रधान—अंतर कांहीं फार नाहीं, तिचा कोकिलस्वर आणि तुमचा काकस्वर.

विदूषक—मग! सगळेच सारखे कुणी तुह्मीं त्रिभुवन धुंडलें तरी मिळावयाचे नाहींत.

चंदन—प्रधानजी! ठाकुरजीच्या दर्शनाची वेळ होत आली कां-रितां इनाम देऊन हिला आपल्या घरीं जाऊंद्या.

प्रधान—जशी सरकारची आज्ञा.

(प्रधानजी वारांगनेला पांच हजार रुपये व पैठणी देतो.)

विदूषक—अरे बापरे! या बटकीचें नशीव फळफळलें. आह्मी जर नायकीण झालों असतों तर आह्मांलाही असेंच मिळालें असतें. पण हें बेटें नशीव जोरावर आहे कोठें.

वारांगना—(बक्षीस घेतल्यानंतर मुजरा करून.)

पद. (क्यों बेदर.)

सहस्रायु महाराज ॥ होऊ दे ॥ सहस्रायु महाराज ॥
रमणिय नगरी चंदनावती शोभतु तो नृपराज ॥ धृ० ॥
दिगंतकीर्ती जानें दुमदुमुनि शत्रु नुरो प्रभुराज ॥ १ ॥

(पडद्यांत पद-भूवरी या०)

वैभव हें क्षण एक न राहिल ॥ होती ग्रहेत जरी प्रतिकूळ ॥
कोठें भार्या ॥ कोठें निजसुत ॥जाईल नकळे राहीन गाफील ॥
हा असे ईश्वरी खेळ ॥ बसेना मेळ ॥ मानवा कधीं ॥
दैवगती फिरल्यावरि न कळे होईल काय गती ॥ १ ॥

चंदन०—हा कोणाचा बरें शब्द, कुणाचाही असो, असले शब्द उच्चारण्यांत उच्चारणाराचा कांहींतरी गूढ हेतु असावा. प्रधानजी! दरबार बरखास्त करा. या गोष्टीचा शोध अगोदर लागला पाहिजे.

(राजा निघून जातो.)

विदूषक—प्रधानजी! सरकारस्वारी एकाएकीं निघून गेली याचें काय बरें कारण?

प्रधान—अरे तूं समजला नाहींस. आतां इतक्यांत कोणी गंभीर

वाणीनें कांहीं शब्द उच्चारले तेव्हां त्यांत कांहींतरी चमत्कार आहे असें वाटल्यावरून ते गेले. चल आतां आपणसुद्धां जाऊ. (दरबार बरखास्त.)

## प्रवेश ३ रा.

(शनी एकटाच प्रवेश करतो.)

शनी— सवाई.

**द्वादशस्थानीं येइन त्यातें गांजीन सत्य तरीच शनी मी ।**
**धनसुत दारा आदिकरोनी नष्ट करीन तरीच शनी मी ॥**
**भूप असो कीं श्रेष्ठ असो तो दीन करीन तयास जनीं मी ।**
**मान्य असे सकलांप्रती जो त्या नीच करीन तरीच शनी मी॥१॥**

आतां चंदन राजाच्या साडेसातीचे दिवस तर नजीक आले. कसें बरें करावें ? आपल्या प्रभावाप्रमाणें त्याला छळलें तर पाहिजेच. पण तसें करायला सुद्धां अडचणच, कारण तो राजा महात्मा, सत्यप्रतिज्ञ आणि न्यायी असा आहे इतकेंच नव्हे तर पुण्यश्लोक राजांतही त्याची गणना केली असतां शोभेल. अशा राजाला छळून आपलें सुद्धां कल्याण होणार नाहीं. तेव्हां त्याला छळूं नये हें चांगलें. हो. झाला हाच निश्चय.

(पडद्यांत."हे शने ! कसला निश्चय करीत बसला आहेस. विधिलेख असत्य ठरवून आपलें वर्चस्व मिळवूं पहातोस हें ठीक नव्हे, करितां विचार कर ! आणि आपलें कर्तव्य बजाव. ')

शनी०—हां, झालों सावध. तुह्मीं अगदीं निष्काळजी असा. देवाधिदेवाची आज्ञा कोणी मोडावी. असो. आतां असें करावें. चंदन राजाला मी द्वादशस्थानीं आलों आहें हें अगोदर कळवावें. ह्मणजे आपण दोषमुक्त झालों. तो दरबारांत बसला असतां माझ्या तोंडचे शब्द ऐकून

**प्रधान**—जशी सरकारची आज्ञा.

(प्रधानजी वारांगनेला पांच हजार रुपये व पैठणी देतो.)

**विदूषक**—अरे बापरे! या बटकीचें नशीब फळफळलें. आह्मीं जर नायकीण झालों असतों तर आह्मांलाही असेंच मिळालें असतें. पण हें बेटें नशीब जोरावर आहे कोठें.

**वारांगना**—(बक्षीस घेतल्यानंतर मुजरा करून.)

पद. (क्यों बेदर.)

**सहस्रायु महाराज ॥ होऊ दे ॥ सहस्रायु महाराज ॥**
**रमणिय नगरी चंदनावती शोभनु तो नृपराज ॥ धृ० ॥**
**दिगंतकीर्ती जानें दुमदुमुनि शत्रु नुरो प्रभुराज ॥ १ ॥**

(पडद्यांत पद–भूवरी या०)

**वैभव हें क्षण एक न राहिल ॥ होती ग्रहते जरी प्रतिकूळ ॥**
**कोठें भार्या ॥ कोठें निजसुत ॥जाईल नकळे राहीन गाफील ॥**
**हा असे ईश्वरी खेळ ॥ बसेना मेळ ॥ मानवा कधीं ॥**
**दैवगती फिरल्यावरि न कळे होईल काय गतो ॥ १ ॥**

**चंदन०**—हा कोणाचा बरें शब्द, कुणाचाही असो, असले शब्द उच्चारण्यांत उच्चारणाराचा कांहींतरी गूढ हेतु असावा. प्रधानजी! दरबार बरखास्त करा. या गोष्टीचा शोध अगोदर लागला पाहिजे.

(राजा निघून जातो.)

**विदूषक**—प्रधानजी! सरकारस्वारी एकाएकीं निघून गेली याचें काय बरें कारण?

**प्रधान**—अरे तूं समजला नाहींस. आतां इतक्यांत कोणी गंभीर

वाणीनें कांहीं शब्द उच्चारले तेव्हां त्यांत कांहींतरी चमत्कार आहे असें वाटल्यावरून ते गेले. चल आतां आपणसुद्धां जाऊं. (दरबार बरखास्त.)

---

## प्रवेश ३ रा.

(शनी एकटाच प्रवेश करतो.)

सवाई.

शनी—

द्वादशस्थानीं येईन त्यातें गांजीन सत्य तरीच शनी मी ।
धनसुत दारा आदिकरोनी नष्ट करीन तरीच शनी मी ॥
भूप असो कीं श्रेष्ठ असो तो दीन करीन तयास जनीं मी ।
मान्य असे सकलांप्रती जो त्या नीच करीन तरीच शनी मी॥१॥

आतां चंदन राजाच्या साडेसातीचे दिवस तर नजीक आले. कसें बरें करावें ? आपल्या प्रभावाप्रमाणें त्याला छळलें तर पाहिजेच. पण तसें करायला सुद्धां अडचणच, कारण तो राजा महात्मा, सत्यप्रतिज्ञ आणि न्यायी असा आहे इतकेंच नव्हे तर पुण्यश्लोक राजांतही त्याची गणना केली असतां शोभेल. अशा राजाला छळून आपलें सुद्धां कल्याण होणार नाहीं. तेव्हां त्याला छळूं नये हें चांगलें. हो. झाला हाच निश्चय.

(पडद्यांत. "हे शने ! कसला निश्चय करीत बसला आहेस. विधिलेख असत्य ठरवून आपलें वर्चस्व मिळवूं पहातोस हें ठीक नव्हे, करितां विचार कर ! आणि आपलें कर्तव्य बजाव.')

शनी०—हां, झालों सावध. तुह्मीं अगदीं निष्काळजी असा. देवाधिदेवाची आज्ञा कोणी मोडावी. असो. आतां असें करावें. चंदन राजाला मी द्वादशस्थानीं आलों आहें हें अगोदर कळवावें. ह्मणजे आपण दोषमुक्त झालों. तो दरबारांत बसला असतां माझ्या तोंडचे शब्द ऐकून

आश्चर्यचकित झाला आहे, तरी आतां त्याला दृष्टान्त द्यावा ह्मणजे झालें. सर्वच कार्यें सुरळीत पार पडलीं आणि माझाही पण मोडला नाहीं.

---

## प्रवेश ४ था.

( स्थळ--मलियागिरी राणीचा महाल. )

राणी---पुष्पावती, अग पुष्पावती !

दासी—काय बाईसाहेब !

राणी— पद ( दासो ऐसें मानु० )

प्राणनाथ अजुनि न कां पातले सुमंदिरीं ॥ उत्सुक होउनि
जरि मी तिष्ठतसें बघ द्वारीं ॥ कुसुमहार गुंफियले प्रेमें मी गे
स्वकरीं ॥ पाहिन पतिकंठीं जधिं होइन बहु हर्षभरी ॥ १ ॥

पुष्पा०—बाईसाहेब तें खरें. आह्मां बायकांना बोलायचें तेवढें समजतें. दरबारांतील कामें काय असतात तीं त्यांचीं त्यांनाच ठाऊक.

राणी०—अग ! कामें असलीं ह्मणून काय झालें, इकडे यावयाला अगदींच वेळ मिळत नसेल. अग, मनांत असलें ह्मणजे सर्व होतें समजलीस.

पुष्पा०—बाईसाहेब ! आपण महाराजांना असें बोलतांना ? ते पहा महाराज इकडेच आले.

राणी०—खरेंच कां ! तर मग तूं जा आपल्या कामाला.

पुष्पा०—आज्ञा बाईसाहेब. ( जाते. )

राणी०—आज महाराजांजवळ एक शब्दसुद्धां बोलावयाची नाहीं ( इतक्यांत राजा येतो त्यास पाहून ) अगबाई, महाराजांची वृत्ती अशी कां बरें दिसतें ! कांहीं तरी झालें आहे खचित.

पद ( अविचार खास. )

**मुखेंदु म्लान बहु झाला नृपालाचा ॥ कवण चिंता असे हृदयीं कळे न मला ॥ सदा विजयी समशेर करीं ॥ नसे शिरस्त्राण तुमचाही तसा कटिला ॥ १ ॥**

राजा०—( पलंगावर बसून आपल्याशीं ) काय आपण ह्मगालांत तें पुन्हा एकवार बोला ! मी आपल्या चरणाचा दास आहें.

राणी०—हें काय ? इथें माझ्याशिवाय तर कोणी नाहीं ? मग बोलावयाचें कुणाशीं होतें आहे ?

राजा०—एकदां ते शब्द आणखीं उच्चारा ! आणि ते जर मलाच उद्देशून असतील तर ह्या राज्यवैभवाचा ईश्वरी कोपानें वियोग होण्यापेक्षां मी स्वतःच त्यावर पाणी सोडून अरण्यांत जाऊन राहीन.

राणी०—अगबाई ! आतां काय करूं ! महाराजांना असें काय झालें आहे, हें मला तर कांहीं सुचत नाहीं ! पुष्पावती, अग पुष्पावती, थोडें गुलाबपाणी घेऊन ये. अंमळ मस्तकावर सिंचन करितें ह्मणजे तरी बरें वाटेल. ( गुलाबपाणी राजाच्या मस्तकावर घालते व थोड्याच वेळांत उभयतांचाही डोळा लागतो. )

शनी०—( प्रवेश करून ) अरे ! हा राजा तर निद्रावश झाला आहे. आतां याला जागृत करावयाला उपाय काय करावा. ( विचार करून ) हो आपण राजा दरबारांत बसला असतां जे शब्द उच्चारले तेच ह्मणावे ह्मणजे झालें.

पद ( भूवरि या० )

वैभव हें क्षण एक न राहिल ॥ होतो ग्रह ते जरी प्रतीकुळ ॥
कोठें भार्या ॥ कोठें निजसुत ॥ जाइल न कळे राहिन
गाफिल ॥ हा असे ईश्वरी खेळ ॥ बसेना मेळ । मानवा
कधीं ॥ दैवगती फिरल्यावरि नकळे होईल कवण गती ॥ १ ॥

राजा०—( जागा होऊन ) हां हेच ते शब्द ! माझ्याजवळच कोणी बोलत आहे कीं काय असें वाटतें. ( उठून ) अरे, हें काय मी पाहतों आहें ! प्रिये ! ऊठ निजलीस काय ? हा महापुरुष कोण आहे पहा—हे महापुरुषा !

पद ( सुखोपभोगा० )

महाभयंकर वेष धरोनी नृपमंदिरिं या कां आला ॥ उघडपणानें
विदित करा मज हेतु मानसिं जो धरिला ॥ सुष्ट असो कीं
अरिष्ट कांहीं चिंता कांहीं न ती मजला ॥ क्षणभंगुर हें वैभव
याचा वीट मानसिं बहु आला ॥ नेणुनियां जरि मजकरवीं प्रभु
प्रमाद अपुला कीं घडला ॥ क्षमा करावी या दासाला विनती
करितों पदकमला ॥ १ ॥

शनी—राजा, अरे तूं मला ओळखलें नाहींस ? सहस्ररश्मी सूर्यनारायण याचा मी पुत्र मला शनैश्वर ह्मणतात.

राजा—महाराज ! या दीनावर प्रसाद करून या ठिकाणीं किमर्थ येणें केलें ?

शनी०—राजा ! मी तुझ्यावर प्रसाद करण्यास्तव आलों नाहीं, तर तुझ्यावर अरिष्ट येणार आहे त्याची सूचना देण्याकरितां आलों आहे.

राजा०—काय मजवर येणाऱ्या अरिष्टांची सूचना देण्याकरितां आ-

पण आलां आहांत ? तर मग महाराज आपण ही विनाकारण तसदी घेते-लीत. माझे पंचप्राण तर आपल्या स्वाधीनच आहेच.

शनी०—राजा तूं ह्मणतोस त्याप्रमाणें पंचप्राणांचें हरण करणारा मी नव्हे. माझा प्रभाव तुला ठाऊक नाहीं, तर ऐकून ठेव.

( पूर्वोक्त सवाई " द्वादशस्थानींही ह्मणतो ! )

असा माझा प्रभाव आहे. तरी आतां मी सांगतों इकडे लक्ष दे. तुझ्या राशीच्या द्वादशस्थानाला मी आलों आहें; परंतु तूं सत्यप्रतिज्ञ व धर्मात्मा आहेस ह्मणून तुला विचारतों कीं, मी तुला या तारुण्यांत छळावें कीं वृद्धावस्थेंत छळावें. याचा जबाब दे. पाहिजे तर तूं आपल्या पत्नीचा विचार घे.

राजा०—प्रिये मलियागिरी ! हें भाषण तूं ऐकलेंसना ! यावर तुझा काय विचार ?

राणी०—महाराज ! या क्षणैक शरिराचा कांहीं भरंवसा नाहीं; तेव्हां परमेश्वराची कृपा किंवा अवकृपा जें काय होणें असेल तें आतांच भोगलें ह्मणजे बरें !

शनी०—कां राजा ! झाला कीं नाहीं विचार !

राजा०—महाराज ! त्यांत कसला विचार ! मी आपल्यास सांगतोंच आहें.

पद ( हें धन तव पद. )

जें विधिलेखन नाटळें ॥ कधिं कुणा जनीं ही ॥ दुःखाचा मग
शा कशाला ॥ तरुण वृद्धपण ना मनीं ॥ १ ॥ वृद्धपणीं तें
सहन न होईल ॥ बल नच राहिल ते क्षणीं ॥ १ ॥

याकरितां आपण प्रस्तुत स्थितींतच जें काय इच्छेस येईल त्याप्रमाणें करावें.

शनी०—फार उत्तम आहे, आतां मी स्वस्थानीं गमन करितों. ( शनी जातो. )

राजा०—प्रिये ! इतक्यांत तो दिसेनासा झाला वाटतें. ही सारी भुतचेष्टा आहे. कारण मध्यरात्रीचा सुमार आहे. द्वारें सर्व बंद आहेत. असें असून हा नाहींसा कसा झाला !

राणी—काय झालें असेल तें असो. दिसेनासा झाला एवढें मात्र खरें.

राजा०—असो. प्रातःकाळ झाल्यावर काय तो विचार. खरोखर

दिंडो.

नेत्रिं त्यातें प्रत्यक्ष पाहियेला ॥ भाषणेही मजसवें बोलियेला ॥
परी व्हावा भासतो मानसाला ॥ तसा वाटे हा गुप्त ह्मणुनि
झाला ॥ १ ॥

---

## प्रवेश ५ वा.

( स्थळ—शहरांतील एक रस्ता. मक्या व तुक्या प्रवेश करितात. )

मक्या—तुक्या ! आज थंड अक्शी कडाक्याची पडलीया न्हव कां ?

तुक्या—त्यें काय इचरूं नगस पग ! आज जर का झोंकली नसती तर या वक्ताला अक्शी गार व्हायाची पाळी आली असती. पन म्हाराजाच्या वाड्यांत अन् समद्या शरामदीं उत्सव असल्यामुळें अक्शी चैन उडाली न्हवं.

मक्या—त्यों काय सांगाया व्हातं ! अर थ्वा रत्येथ्वार आज काय जकड तकड अक्शी चकाचक होऊन शानी गेलयां.

तुक्या०—अर समद्या शाराचें कशाला होवं ? पन् महाराजाच्या वाड्यावरचं निशान् कसं फडकात व्हतं त्येत पघितलस का ?

मक्या०—न्हाईबा. ( वर पाहतो. ) अव तुकोबा, ह्यें व काय ? आगीचा डोंब कसला दिसतुया !

तुक्या०—चल ! मुरदाड सान्या मुलुखाचा. निशान् लावलयां, तर ह्मन आगीचा डोंब चाललाया.

मक्या०—मी काय खोटं बोलत न्हाई पगा तर अदुगर.

तुक्या०—( उठून पाहून ) अर बापरे ! काय ह्यो लोळ चाललाया ! मक्या, मक्या ! शीग फुक समद्यासनी जागं कर.

( शिंगें वाजवितात सर्व शहर गजबजून जाऊन आग विझवितात )

राजा०--प्रधानजी ! असें होण्याचें काय बरें कारण !

प्रधान०-कारण कसलें ! दारू गोळ्या शेजारीं कोणी तरी चिलीम प्याला असेल किंवा पहारेकऱ्यांपैकीं कुणी तरी हुक्का पीत बसला असतां विस्तव उडाला असेल दुसरें कांहीं नाहीं.

राजा०--तुह्मीं ह्मणतां पण दारूगोळ्या शेजारीं मध्ये कांहीं नवीन पाहारा नाहीं करीत ? ( मनांत ) समजलों त्या महापुरुषानें सांगितल्या गोष्टीचा पहिला अनुभव हा–

पद ( रजनिनाथ )

महापुरुष जें भविष्य वदला ॥ नि:सारचि वाटत तें मजला ॥
किंतु मनिं ना मुळिंही उरला ॥ फेरा पालटला ॥ रक्षणकर्ता
समर्थ तोचि ॥ अन्य न कुणि उरला ॥ १ ॥

( जातात. )

---

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

( शनी एकटाच प्रवेश करितो. )

शनी—त्या चंदन राजाला भविष्य-वृत्तांत सांगितल्यामुळें मीं आपल्या कर्तव्यांतून मोकळा झालों असें मानण्यास चिंता नाहीं. आतां त्याच्या मागण्याप्रमाणें आपला प्रभाव कसा आहे त्याचा चमत्कार त्याला दाखविला पाहिजे. आतां असें करतों ज्या जयसिंग राजाचा त्यानें नुक्ताच पाडाव केला आहे त्याच जयसिंग राजाकडून त्याचें राज्य हिरावून घेतों आणि तो पार देशोधडीस मिळून जाईल असें करतों. हो ! असेंच करावयाचें याशिवाय तोडच नाहीं दुसरी. चला आपण आपल्या कार्याला लागावें. ( जातो )

## प्र० २ रा.

( जयसिंग राजा कांहीं सरदारांसह येतो. )

जयसिंग०—विजयसिंह ! आपल्या फौजेचा बंदोबस्त नीट ठेवा ! व सर्व रिसालदारांस सावध रहाण्याविषयीं ताकीद द्या. राजा चंदन, हा किती कपटी आहे हें तुम्हांला ठाऊक आहेच.

विजय०—महाराजांनीं त्याबद्दल वेफिकिर असावें. चंदन राजा पराक्रमी असला म्हणून काय झालें. आम्ही कांहीं निर्बल राजाच्या अन्नावर एवढे वाढलों नाहींत. आम्हीं आपली अर्धांगी समशेरच समजतों आहों. तेव्हां आपल्या जिवाला काळजी लावून घेण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.

जयसिंग०—या ठिकाणाहून चंदनावती किती मजल्यावर आहे?

**विजय०**—चंदनावती ! फार लांब नाहीं. मला असें वाटतें कीं, आज संध्याकाळच्या मुक्कामाला आपण तेथें पोहोंचूं !

**जयसिंग०**—पण विजयसिंग त्याच्या नगरींत आपला प्रवेश कसा व्हावा.

**विजय०**—अँः त्याबद्दल युक्ती मी काढिली आहे. माझा तर्क असा वाहतो कीं नुकताच जय संपादन केल्यामुळें त्याला स्वर्ग अगदीं दोनच बोटें राहिल्यासारखें झालें असेल. आणि ह्मणुनच किल्ल्यावरील बंदोवस्त कडक नसून ढिलाच असेल. तर मी किल्ल्यांत चोरून प्रवेश करितों; आपण सर्व सैन्यानिशीं तटाखालीं तयार असा. मी शिंग वाजिवलें कीं काम फत्ते झालें असें समजा.

**जयसिं०**—ठीक आहे. हाच उपाय सयुक्तीक दिसतो. तुह्मीं आतां सर्वांना विशेष सावधगिरीनें वागण्यास सांगा ! आणि घोड्यानां कुलुंवा पाजून आतांच्या आतांच येथून कुच करायचा.

**विजय०**—जशी आज्ञा. ( जातात )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ०—( राणीचा महाल. )

पुष्पा०—बाईसाहेब आज आपण अशा चिंताक्रांत कां बरें दिसतां; सरकारस्वारी आज रागावली कीं काय ?

राणी०—छेग ! पुष्पावती हें काय भलतेंच बोलतेस. पहा—

पद ( वेषाचें सार्थक. )

**सन्निध मी नसलें जरी एक क्षणभरी ॥ जणु गेलें युग सखे गमत अंतरीं ॥ धृ० ॥ प्राणाहुनि अधिक प्रिय अन्य सुंदरी ॥**

नाहिं सखे मजवांचुनि सत्य भूवरी ॥ कोप कधीं दासजना
वरिही ना करी ॥ होईन मी प्राप्त कशी सांग तूं तरी ॥ १ ॥

पुष्पा०—मग कांय दुसरें कारण? तुह्मींच सांगा पाहूं.

राणी०—अग, उगीच काय बडबड करीत बसली आहेस. मला कांहीं झालें नाहीं हो! मी रोजच्या सारखीच नाहीं का तुला दिसत.

पुष्पा०—हें पहा, मी जर तुमच्या जवळ रहाणारी नसतें तर तुह्मीं ह्मणतां हें मी खरें मानलें असतें, पण तसें नाहीं ह्मणून या बोलण्यावर माझा मुळिंच भरंवसा बसत नाहीं.

राणी०—माझ्या मनाला बरें वाटावें ह्मणून तूं कांहीं तरी बोलते आहेस झालें.

पुष्पा०—बाईसाहेब! चेहऱ्यावरून ज्याला माणसाची परिक्षा होत नाहीं, त्याला माणूस ह्मणण्यापेक्षां पशूच ह्मणणें बरें असें नाहीं का? आतां आलें माझ्या ध्यानांत! आपण महाराजांच्या जवळ एखादी वस्तू मागितली असेल आणि ती न मिळाल्यामुळें असें झालें असावें. हो. होयना!

राणी०—हें अगदीं माणूसपणाला शोभेल असें बोललीस नाहीं.

पद (सुप्रसन्नकांत.)

सार्वभौम नृप जाया असुनीया मी जगतीं ॥ केंवि पडे सांग
उणें संप्रतीं मजप्रती ॥ धृ० ॥ अगणित भांडारगृहें संतत
भरलिं असती ॥ न्यून नसे कसलें ही शंका कशि तव चित्तीं॥
भल भलतें त्वच वदसी नष्ट झाली जणु सुमता ॥ १ ॥

पुष्पा०—बाईसाहेब, आपल्या मनातून कळवायचें नसेल तर नका कळवूं ! माझें मन वेडें म्हणून मी आपल्याला पुन्हां पुन्हां विचारतें हो.

राणी०—पुष्पावती ! अग तुला सांगावयाचें नाहीं तर कोणाला ! गडे कालरात्रीं–

अंजनी गीत.

दुःस्वप्नातें मी देखियलें ॥ तें पासुनि मन वेडें झालें ॥ केंवि
होय गती मज हें नकळे ॥ काय वदूं तुजला ॥ १ ॥

पुष्पा०—पण बाईसाहेब, तें दुःस्वप्न असें कशावरून? कुणी सांगितलें तुह्मांला ?

राणी०—अग सांगायला कशाला पाहिजे. बरें वाईट मला नाहीं का समजत ?

पुष्पा०—तसें उगीच संशयात्मक कशाला ! काय स्वप्न पडलें तें मला सांगा ! ह्मणजे मी शास्त्रीबुवांना कळवून त्याचा निर्णय लावीन सांगा पाहूं ! मनांत अगदीं शंका किंवा भिती धरुं नका ! अहो हीं स्वप्नें ह्मणजे निव्वळ खोटीं. सांगा तर पाहूं तुह्मांला काय पडलें तें.

राणी०—पुष्पावती ! काय सांगूं तुला—

पद ( अजि अक्रुर )

मज एकाकीं काल पुरुष तो दिसला ॥ वाटे मज समीपचि
आला ॥ त्या पाहुनियां कंप शरीरीं सुटला ॥ भीती हो बहु
चित्ताला ॥ क्रोधानें लालचि झाला ॥ प्रति वन्ही गमे तो
मजला ॥ गरगर फिरवितसे तो बाई ॥ नयनाला ॥ प्रतिकृतांत
मंदिरीं आला ॥ १ ॥

पुष्पा०—बरें मग पुढें काय झालें ?

राणी०—अग पुढें काय झालें ह्मणून काय विचारतेस ?

पद ( चंद्रकान्त राजा० )

निज अंकावरी घेऊनि बसलें मंदिरीं प्रियबाला ॥ काळ पुरुष तो भयाण वेषें सन्निध ये वेळा ॥ रे दुःष्टा तूं पात्र न होसी सुखोपभोगाला ॥ दांत करकरा खाऊनि त्यानें धरिलें हस्ताला ॥ निर्दयतेनें ओढियलें गे माझ्या वेल्हाळा ॥ परोपरीनें त्यासी विनविलें पाझर नच फुटला ॥ १ ॥

पुष्पा०—हात्तिच्या ! हेंच ना स्वप्न ! त्याची हो इतकी कशाला काळजी. मी आत्तां जाऊन शास्त्रीबुवांना सांगतें ह्मणजे ते कांहीं जपजाप करतील.

राणी०—अग ! जप करून काय होतें ?

पुष्पा०—काय होतें ? ज्याच्या इच्छेनें आज एवढी पृथ्वी चालली आहे त्याच्या कृपेनें काय पाहिजे तें होईल.

राणी०—जा तर मग लौकर ! आणि प्रधानजीनां सांगून शास्त्रीबुवांनां कळीव.

पुष्पा०—( पाहून ) कळवायला कांहीं मलाच जायला नको. हे पहा कंचुकी इकडे येताहेत त्यानां सांगितलें ह्मणजे झालें.

( कंचुकी येतो—मुजरा करून उभा राहतो )

कंचुकी०—राणीसाहेब, महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें बाहेर मेणा आणला आहे तरी त्यांत आपण बसून चलावें.

राणी०—पण कंचुकी ! असें एकाएकीं सांगण्याचें कारण ? आणि ह्या मेण्यांत बसून मी जायचें कुठे ?

कंचुकी०—आपल्या केसर गडावर ?

राणी०—ह्मणजे काय प्रकार आहे तो मला कळवा तरी ते कुठे आहेत. आणि माझें बाळ कुठे दिसत नाहीं.

कंचुकी०—त्यांच्याविषयीं आपण अगदीं बेफिकिर असा. तुह्मीं किल्ल्यांत गेलात ह्मणजे सर्व तुह्मांला भेटतील.

राणी०—पण कंचुकी ! हें वर्तमान तरी काय आहे ?

कंचुकी०—तें तुह्मांला तिकडेच कळेल. आतां उगीच विलंब करूं नका. उठा आणि मेण्यांत बसा.

राणी०—मला बसा ह्मणून सांगणार तुह्मीं पण बसायचें माझ्य स्वाधीन आहेना !

कंचुकी०—राणीसाहेब ! असें बोलून विलंब करूं नका. जेवढें जलद हें काम होईल तेवढें केलें पाहिजे.

राणी०—तुह्मीं सांगता तर मी येतें पण कारण काय तें मला कळलें पाहिजे.

कंचुकी०—राणीसाहेब—

पद ( मेद झडोनी० )

माडंलीक नृप जयसिंगचि तो चाल करोनी ये फिरुनी ॥ एकवार हतवीर्यची केला बाहुबलें महाराजानीं ॥ सर्व सिद्धता करुनि निघाले वीर नृपतिसह रणांगणीं ॥ सर्व स्त्रियांनीं निजबाळासह राहावें अजि शांतस्थानीं ॥ १ ॥

राणी०—असें का आहे चलातर ! आई माते जगदंबे.—

पद ( दासी ऐसें० )

श्री वरदे रणिं जय दे प्रियकरास ही विनती ॥ चरणीं लीन

दीन दासी प्रेमभरें करि प्रणती॥सौभाग्या संतत दे दे भूपा मनि शांती ॥ रिपु भय तें किमपी नुरो चिरसुखहो भूवरती ॥ १ ॥

( जातात. )

---

( विदूषक व मुलगा प्र० क० )

गोट्या०—बाबा ! आतां एवढें मोठें लष्कर चालून आलें आहे. मला तर भीती वाटूं लागली आहे. तुह्मीं आतां कसें करणार ?

विदूषक०—अँ:— मूर्ख बेटा शत्रूला भ्यायला कशाला पाहिजे. अरे राजाचें सैन्य निघालें कीं मी जाणार. शत्रु शत्रु ह्मणजे विशाद काय ? शत्रू एकीकडे आणि मी एकीकडे !

गोट्या०—बाबा मग मी सुद्धां तुमच्या बरोबर येईन. ही पहा कमर बांधलीच समजा.

विदूषक०—छे. तूं नको येऊंस ! तूं आलास तर मग घरांत कोण

गोट्या०—घरांत आई आहे तर खरी !

विदूषक०—तसें नाहीं उपयोगी !

गोट्या०—हें काय हो बाबा ! मी आपला येणार !

विदूषक०—पण तूं लढाईवर जाऊन करणार काय ?

गोट्या०—करणार काय ! बाबा माझा पराक्रम अद्याप तुह्मीं पाहिला नाहीं–मी असें करीन–

पद ( नृप तनयेवर० )

तरवार करीं घेऊनी कोणी आला मजवर धांवोनी ॥ सामोरा मी मुळी न राहतां जाइन मागें परतोनीं ॥ पळोन जाति जे ॥

रणां मधोनियां ॥ पुढती त्यांचिया ॥ पळेन मी पहा ॥ सैन्य ये जरी ॥ चालोनि मजवरी ॥ जाई मी घरीं ॥ पळोनि अवसरीं ॥ मर्दुमकी दाउनीयां ॥ कीर्ती मिळविन जगती या ॥१॥

विदूषक०—अशीच का लढाई मारणार ! माझा मुलगा खरा. दोन वेळां भोजनाला असलें ह्मणजे झालें. ( पडद्याकडे पाहून ) बरें महाराज लढाईवर जायला निघाले आहेत त्यांना श्रीफळ द्यावयाला तरी चल.

गोट्या०—तें माझें काम—( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

स्थळ—( किल्यांतील एक महाल. )

राणी०—( राजास ) मला एकाएकीं याठिकाणीं कां आणलें बरें. आणि माझे चिमणे बाळ वीर आणि शूर कुठे आहेत ?

चंदन०—ते दारू गोळ्याचें काम चाललें आहे तिकडे आहेत.

राणी०—तिकडे काय करताहेत ?

चंदन०—येतील ते इतक्यांत. क्षात्रबीजाला हेंच योग्य.

राणी०—बरें पण इकडे आणण्याचें काय बरें कारण ! आणि जिवाला स्वस्थता कां नाहीं ?

चंदन०—प्रिये ! तुला काय सांगूं, आपल्याला काळ उलटा आलेला आहे. एके दिवशीं आपण महालांत निद्रिस्त असतां एका महापुरुषानें प्रत्यक्ष दर्शन देऊन काय सांगितलें तें तूं विसरलीस वाटतें.

राणी०—नाहीं विसरलें नाहीं ! मला ती गोष्ट पक्की स्मरते आहे. मग त्याचें काय ?

चंदन०—अग तो प्रत्यक्ष ज्ञानी, त्यांनीं सांगितल्या गोष्टीचा अनुभव हळू हळू येत चालला आहे. आपल्या विजयदुर्गाभोंवतीं शत्रूनीं वेढा दिल्याची खबर हेरांनीं आणिली आहे; तर तूं याठिकाणीं रहा मी आतां जातों. कांहीं काळजी करूं नको समजलीस.

राणी०—हें काय ? शत्रूंनी किल्ल्याला वेढा दिला ह्मणून अगदीं स्वतःच का जायला हवें.

चंदन०—नाहीं तर ! असलीं कामें दुसऱ्यावर का टाकून होत असतात. अग ! आपल्या राज्याची काळजी आपण नाहीं केली तर कोण घेणार ?

पद. ( ही कामाची )

बहु शूर असे सरदार ॥ पराक्रमी फार पदरीं असुनी ॥ कां
जिवा त्रास घ्यातरी ॥ ते जाती समरांगणीं ॥ शत्रु जिंकुनी ॥
आणितिल येथ तयां बांधुनि ॥ चिंता करितां मग कां मनीं ॥
मी राहूं कशी एकली ॥ रम्य माहलीं ॥ कठिण कालीं ॥ मज
सुचेन मुळिं या कालीं ॥ प्रियकरा जोडुनीकरा ॥ दूर नाकरा॥
दासी भुवनी ॥ जाणें तरी जा घेवोनी ॥ १ ॥

चंदन०—तुला कांहीं समजत नाहीं. बायका कुठे लढाईवर गेलेल्या ऐकल्या आहेस.

राणी०—( हट्टानें ) तें कांहीं नाहीं ! मला तरी घेऊन जावें नाहींतर आपणच जाऊं नये.

चंदन०—हें पहा ! तुला लागलें आहे वेड. प्रजेच्या सुखाकरितां जर आह्मीं आपल्या जिवावर उदार होऊन रणांत गेलों नाहीं तर आह्मीं

राजे कसले. बुद्धिबळांतल्या राजांची आणि आमची किंमत एकच. तुला सांगतों.

पद. ( झंपा )

पुत्रवत प्रिय प्रजा मानणें उचित तें ॥ राजनीती असे भूप-
तीतें ॥ छळिती जे त्यांप्रती ॥ नीचतर दुर्मती ॥ पाठवावें
तयां यमपुरीतें ॥ ना तरि व्यर्थ अह्मीं भार ह्या भूमीला ॥
राज्य जावो ह्मणीं नष्ट होतें ॥ १ ॥

यासाठीं माझ्या जाण्याला तूं प्रतिबंध करूं नकोस.

( इतक्यांत वीरसिंह आणि शूरसेन येतात. )

वीर०—आई! बाबा कुठें ग जातों ह्मणतात ? मी जातों त्यांच्याबरोबर!

शूर०—आई ! वीराला धाडलास तर मीही जाईन मी नाहीं इथे रहाणार हो !

राणी०—बाळानों ! ते किनई लढाईवर जात आहेत हो.

शूर०—आई ! मी जातों लढाईला.

राणी०—लढाईवर कसले जातां ? तुह्मीं तिथला प्रकार पाहून भिऊन जाल.

शूर०—आई ! तिकडे काय ग असतें.

राणी०—बाळानों—

पद ( खरोखर भूत )

कितिक रणीं मुकताती प्राणा ॥ शत्रू येउनि लत्ताप्रहरीं हा-
णिताती त्यानां ॥ धृ० ॥ शत्रू कडील कुणी गवसे हातीं ॥
चिरिती चरर बघवेना ॥ १ ॥ रक्तपाट ते वाहती तेथें सहन
न हो नेत्रांना ॥ २ ॥

ह्मणून सांगतें तुह्मीं तें नांव सुद्धां काढूं नका.

वीर०—काय ह्मणतेस आह्मीं लढाईवर गेलोंतर भिऊं असें नांव सुद्धां काढूं नकोस.—

पद.( हां हां ह्मणतां )

तातां संगें जातों आतां समर कराया हे माते ॥ शत्रूदळ तें निर्दाळुनियां पावेन पहा विजयातें ॥ वीर पुत्र मी ॥ कधीं भिई न मी ॥ ब्रीद आपुलें ॥ कधीं त्यजीनमी ॥ दे आज्ञा बाळाला ॥ शंका न धरि स्वमनाला ॥ १ ॥

चंदन०—बाळानों ! तुह्मीं तसेच शूर अहां. मी प्रधानजीबरोबर तुह्मांला रथ पाठवीन त्यामधून मग या बरें. ( ऐकल्यासारखें करून ) हीं पहा शिंगें वाजूं लागलीं आतां मला गेलेंच पाहिजे.

---

## प्रवेश ५ वा.

( विजयसिंह आणि जयसिंग )

विजय०—त्या चंदन राजाचा पराभव करून आपला झेंडा केव्हां उभारीन असें होऊन गेलें आहें.

पद ( समरांत समशेर० )

अपमान केला आमुचा जरि तो ॥ पूर्वी परी खेद हृदयासी होतो ॥ बाहुस्फुरण करिती समशेर घ्याया ॥ नृप चंदनाच्या प्राणा हराया ॥ केव्हां करीं होय निःपात रिपुचा ॥ शांती मना येन बाणा विराचा ॥ १ ॥

विजयसिं०—अहो तुह्मांला काय सांगूं त्या चंदन राजाचें स्मरण होतांच–

पद ( झंपा. )

क्षात्र बीज त्वरें जाई उसळोनियां ॥ कर्णि रणगर्जना करिती
भेरी ॥ शत्रुपाता विणें कांहींना मज दिसे ॥ त्याविना सकलही
शून्य भासे ॥ विजय माला गळां घालि रणदेवता ॥ तेधवां
सौख्य होईल हृदया ॥ १ ॥

बरें विजय सिंह गुप्त हेर पाठविले होते त्यांनीं काय खबर आणली.

विजय०—महाराज ! अद्याप हेर आले नाहींत. पण इतक्यांत येतील.

( इतक्यांत हेर येतो. )

हेर०—सरकार ! चंदन राजा आपल्या सांबाच्या देऊळांत प्रार्थना करीत बसला आहे.

जयसिंग०—काय ? देवासमोर प्रार्थना करीत बसला आहे ? विजय सिंह-सर्व सरदार हो—

पद ( कनककांता. )

चला झडकरि देवमंदिरीं वाट कां पाहतां ॥ शत्रु सहजीं सो-
डिता कां लागतो हाता ॥ भजन पूजनीं दंग झाला बघुनी
अवचिता ॥ खड्गघायें स्नान घाला तोषवा माता ॥ १ ॥

( जातात )

---

## प्र० ६ वा.

( स्थळ—शिवालय सरदारांसह चंदनराजा प्रार्थना करीत आहे )

सर्व— पद ( ही यवनाची० )

भो सदाशिवा ॥ या सदा शिवा ॥ पळवा अशिवा ॥ दा

जगांतुनी ॥ या जगांतुनी ॥ या नृपुंगवा ॥ हे उमाधवा घ्या पदरीं ॥ लीन हा तव चरणीं ॥ तव कृपा प्रसाद जरि असे अह्मांस ॥ तरी मिळवूं यशास ॥ अह्मी पशुपती ॥ अह्मीं पशूपती ॥ रिपुगर्वापहार ॥ गळां विजय श्रीहार ॥ भरूं जयजयकारें ही अवनीं ॥ १ ॥

( पडद्यांत )

पद ( पुरे करा आतां )

चला करा त्वरा ॥ रिपु त्वरें धरा ॥ भजन रंगी दंग त्यास बद्ध झणिकरा ॥ १ ॥

( इतक्यांत एक शिपाई धावऱ्या धावऱ्या येतो. )

शि०—म-म-म-हा-हा- रा-रा-राज शत्रू आ-आ-ले चला ला. स्व-स्व-स्थ का-काय वस-लां-त त.

चंदन०—काय शत्रू आले बोला जय हर!

साकी.

प्रळय कालिंचा चंड वाततो पाडी महा नगातें ॥ तेंवि करोनि पराक्रमातें निर्दालीन रिपुचमुतें ॥ सांभाळोनि रहा बाहु बल तें नयनी पहा ॥ १ ॥ ( जातात. )

---

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

( दोन गृहस्थ प्रवेश करितात. )

मधुसूदन०—काय हो त्रिविक्रमपंत, आपल्या महाराजांविषयीं कां-

हींच खबर लागत नाहीं यावरून समजावें तरी काय ? त्यांचें काय झालें असेल ?

त्रिविक्रम०—काय झालें असेल तें त्या जगदीशाला ठाऊक. प्रधान मंडळीपैकीं थोड्यांनीं का खटपट केली. पण त्यांच्या प्रयत्नास किमपिही यश आलें नाहीं. काय करावें ? कोणी कांहीं सांगतात, कोणी कांहीं सांगतात. पण कुणाच्याच सांगण्यांत मेळ बसत नाहीं. त्यांतून मला चमत्कार हा वाटतो कीं राणीसाहेबांचा आणि युवराजांचाही कोठें तपास लागत नाहीं. पण तुह्मांला खचित सांगतों, आपल्या महाराजांसारखा सत्य प्रतिज्ञ व शूर राजा चंद्र सूर्य आहेत तोंपर्यंत सुद्धां होणार नाहीं. तूं त्या ठिकाणीं नव्हतास ह्मणून महाराजांचा पराक्रम तुझ्या दृष्टोत्पत्तीस आला नाहीं. नाहीं तर त्यावेळची त्यांची ती मुद्रा पाहून तुझ्या अंगावर रोमांच थरारले असते.

मधुसू०—माझेंच दुर्दैव ह्मणावयाचें. आतां तो राजा पुन्हां कुठला दृष्टीस पडायला. तेवढी आमची पुण्याई कोठें सबळ आहे. कुणी ह्मणतात कीं सध्याच्या या राजानें त्याचा प्राण न घेतां त्यानां फकीरवेषानें रहाण्याची मुभा दिली आहे.

त्रिविक्रम०—काय असेल तें असो कांहीं जरी असलें तरी त्यांच्या नशिबीं दुःख आलें खरें.

मधूसुद०—पण मी तुला खात्रीनें सांगतों, महाराज तूर्त कोठेंही असले आणि त्यानां कितो ही संकटें सोसावीं लागत असलीं तरी कधींनां कधीं त्यानां पूर्ववत सौख्य प्राप्त होईल.

त्रिविक्रम०—हें कशावरून ह्मणतोस तूं ?

मधूसुद०—कशावरून कां होईना. आणि हें पहा या गोष्टी रस्त्यांत नकोत तुझ्याच वाड्यांत चल ह्मणजे सर्व सांगतों.

त्रिविक्रम०—ठीक आहे चल तर. (जातात)

## प्रवेश २ रा.

(चंदनराजा, राणी मलियागिरी व शूरसिंह विरसिंह प्रवेश करितात.)

चंदनराजा०—पद. (जातेकीं मम.)

**राजविलासी बालक माझे अनवाणी फिरती ॥ जनक तयांचा जवळि असोनी मी व्यर्थचि कीं जगतीं ॥ धृ० ॥ लालनं पालन करुनीप्रेमें कुरवावाळुनि हस्तीं ॥ वाढविलें त्यापरिदुर्दैवें आली ऐसी स्थिती ॥ दुर्भागी अशीं सत्यचि भुवनी ह्मणु प्राप्तगती ॥ १ ॥**

परमेश्वरा, तुझ्या लीलेचा अंत कोणालाही लागणार नाहीं. तूं निराकार, निर्गुण, असा आहेस. आणि ह्मणूनच आह्मांला अशा विपत्तीस्थितींत आणिलेंस. नाहींपेक्षा त्या जयसिंगाचें सामर्थ्य माझ्यापासून जय मिळविण्या इतकें खरोखरीच नव्हतें. ज्याच्यापासून मी कारभार घेत असें त्यानेंच मला पदच्यूत करावें अँ! यापरता आणखी दैवीक चमत्कार तो कोणता. माझ्या प्रिय प्रजाजनानां मी आतां कायमचाच अंतरलों. असो तुझ्या इच्छेनेंच जर सर्व सृष्टी चालत आहे तर प्राप्त झालेलें दुःख हें सुखच समजलें पाहिजे.

वीर०—बाबा, माझे किनई आतां पाय दुःखूं लागले. माझ्याच्यानें एक पाऊल सुद्धां पुढें टाकवत नाहीं. आतां मी कायहो करूं. हा माझ्या पायाचा ठणका एका ठिकाणीं बसल्यावांचून कांहीं राहणार नाहीं.

चंदन०—बाळा, अंमळ पुढें गेलों किनई ह्मणजे त्या मोठ्या झाडाखालीं बसूं बरें. आमच्या बरोबर तुह्मांलाही दुःख भोगायचें आलें त्याला काय बरें करणार?

शूर०—आईग ! मला कडेवर घे ग ! माझे पाय बघ कसे अगदीं दमून गेले आहेत. आई, मला कसेंसेंच होत आहे ?

मलियागि०—बाळा, अरे तुमचे पाय दुखायला लागले हें मला नाहींका कळत. अरे मला वाईट का वाटत नाहीं. पण मी तरी काय बरें करूं. खरेंच देवा मला हें दुःख पाह्यला जगवलीस तरी कशाला ?

पद. ( जन्मकांवृथा० )

जननी ही न वैरिणी मूर्तिमंत पापिणी ॥ जिवंत ठेविली कशास
भार व्यर्थ होउनीं ॥ पूर्वजन्मीं संचय मी पातकि केला ह्मणुनी॥
सौख्य लया जाय सर्व दुःख येई प्राक्तनीं ॥ १ ॥

विर०—आई, मला भूक लागली. आह्मांस कांहीं तरी खायला दे. आमचे प्राण भुकेनें कसे व्याकूळ होताहेत. आई, आह्मीं तुझी इतकी विनवणी करितों पण तुला कांहींच कांग नाहीं दया येत आई, तूं अशी कशीग निष्ठुर झालीस?

मलिया०—बाळानों, अरे मी कसली निर्दय ! माझ्यापेक्षां यमदूत तरी बरे ! बाळानों, अंमळ या झाडाखालीं बसा. ह्मणजे मग मी तिकडे सांगून कांहीं फळें मूळें मिळालीं तर आणायला सांगतें ! देवा ! कायरे ह्या प्रसंग. माझ्या तान्ह्याला वेळेला पाणी मिळूं नये, अशी वेळ आणिलीसना ?

पद. ( पांडुनृपतिजनक० )

षड्रसान्न भक्षणासी ॥ प्राप्त जया हो तयासी ॥ कंदमुळें खा-
वयासी ॥ मिळतिना पुरीं ॥ १ ॥ पुष्पशेज पहुडाया ॥ योग्य
असे मम चिलया ॥ वैभव गेलें विलया ॥ प्राप्त ही दशा ॥ २ ॥

वीर०—आई, आतां किनई माझ्यानें मुळिंच दम धरवत नाहीं, जर तूं मला खायला देणार नाहींस तर माझो कांहीं धडगत नाहीं.

मलिया०—( राजास ) आतां या लाडक्यांला मी काय बरें देऊं आपण तरी यांची समजूत करावी. बाळा—

पद. ( त्या-मदनमनोम० )

वदुं काय तुला मी बाळा मति माझी कुंठित झाली ॥ दुर्दिन हा
आजि उदेला तुह्मीं जरी वैभवशाली ॥ सुखदाशा आतां सर-
ली ॥ दुःखाची पाळी आली ॥ कोणी ना वाली ॥ अशा या
कालीं ॥ मति माझी कुंठित झाली ॥ १ ॥

चंदन०—प्रिये, अग हें काय वेड्यासारखें करित्येस आपण किती जरी दुःख केलें तरी जें होणार तें कुणाला चुकणार आहे का, ज्याच्या इच्छेनें सर्व जगत्त्रय चाललें आहे त्याचें स्तवन करावें ह्मणजे त्याच्याच कृपेनें सर्व संकटें दूर होतील.

पद. ( आळशावरगंगा० )

जगपालक रुष्ट जहाला ॥ करिसीकांमग दुखाला ॥ प्रियसखे ॥
दैवाचा फेरा फिरला ॥ दुर्धर हा प्रसंग आला ॥ प्रियसखे ॥
स्थीरता धरी स्वमनाला ॥ विसरुनि जावें क्लेशाला ॥ प्रियस-

खे ॥ शनिदेव ॥ रुष्ट स्वयमेव ॥ उलटलें दैव ॥ उपाय न उ-
रला ॥ लागूंगे प्रभुपद कमला ॥ १ ॥

शूरसिंह०—बाबा आई.

पद. ( आहा देवा० )

प्राण जाऊं बघती माते क्षुधेनें मी करूं काइ ॥ शक्ती नुरली
तिळहि अह्मां बसायासी एक ठांई ॥ जननि वदनिं कां न व-
दसी बालकासी अशा समयीं ॥ कोण सांगे तुजविनागे जगीं
या दीन बालासी ॥ १ ॥

वीरसिंह०—बाबा ! तुह्मीं कांहो भाषण करीत नाहीं, आमच्यावर तुह्मीं कां बरें रागावलां आहां ?

चंदन०—बाळानों, अरे तुह्मां अर्भकांवर रागावयाला तुह्मीं माझें काय बरें केलेंत. अरे तुह्मांला अशा दुःखांत पाहूनच माझ्या तोंडून शब्द निघत नाहीं.

शूरसिंह०—पण बाबा—

पद. ( गाडीदे आधीं० )

द्या अह्मां जल प्याया ॥ तृषाक्रांत आह्मीं जाहलों वनिं या
॥ धृ० ॥ रवितापमुळिं सहन न होतो ॥ जाळितसे तो काया
॥ १ ॥ शोष लागला मत्कंठाला ॥ तळमळ वाटे हृदया ॥ २ ॥

चंदन०—परमेश्वरा ! काय हा प्रसंग !

पद. ( दृष्टीस पडल्या० )

महदपराधी ह्मणुनी अह्मांसी ॥ प्राप्त दशा प्रभु अशी केलोसी
॥ धृ० ॥ तनयजहाले अरण्यवासी ॥ दुःसह दुःखें सहन

न त्यासीं ॥ दीनवदनीबघुनियां तयांसी ॥ भड भडतें हृदयासी ॥ १ ॥

प्रिये ! तुह्मीं या ठिकाणीं बसून विश्रांती घ्या ! मी जवळपास कोठें पाणी असलें तर त्याचा शोध लावून घेऊन येतों.

शूर०—बाबा ! पण तुह्मीं लौकर यालना ?

चंदन०--बाळानों, अगदीं लौकर येईन बरें.

शूर०-वीर—नाहीं तर पहा—

पद. ( नृपालकोप० )

विलंब लागला तुह्मांस यावयातरी ॥ पंचप्राण देह सोडुं पाहती तरी ॥ अन्नलेश करिन कार्य उदक ना तरी ॥ करा कृपा॥ अह्मांवरी ॥ नाना आणा उदक सत्वरी ॥ १ ॥

( जातो. )

---

## प्रवेश ३ रा.

( चंदन राजाचा प्रधान एकटाच प्रवेश करितो ).

प्रधान०—काय दैवाची करणी विचित्र आहे पहा.—

पद. ( पंचतुंडनर० )

सत्वशील जो वीरमुकुटमणी भूपती आह्मां त्यागोनी ॥ प्रियपुत्रासम निजप्रजेला वागवि गेला सोडोनी ॥ धृ० ॥ आजवरी बहु जहाले नृपती परी यासम नव्हता कोणी ॥ दक्ष असे नित प्रजापालनी राज्यशकट हांकी जपुनी ॥ भाग्यशाली नृपपुंगव ऐसा पाहियला म्यां नच नयनीं ॥ दु:खसागरीं लोटुनि सकलां बसला येना तें कळुनी ॥ १ ॥

त्या राजाच्या दुःखांत सर्व प्रजा रात्रंदिवस झुरत आहे. मला तीं त्याचीं वियोगदुःखाचीं गाऱ्हाणीं ऐकतांना त्रास आला. आणि हा मार्ग धरिला. खरोखर आमच्या महाराजांसारखा राजा ज्या प्रजेचें पालन करीत असेल तीच प्रजा खरी सुखी. खरोखर मला तर असें होऊन गेलें आहे कीं—

पद. ( माझाभरतदेखिला० )

**पाहिन जेव्हां नयनानीं ॥ मानिन सौख्यजनीं ॥ अन्न लेश नच भक्षिन मी ॥ दृष्टी पडे जोंवरि स्वामी ॥ साक्षी असतो सुर व्योमीं ॥ वचन प्रमाणचि हें जाणा ॥ १ ॥**

असो. आपण आपला निश्चय कधींही ढळूं द्यावयाचा नाहीं. ज्या राजानें आपल्या प्रजेला पोटच्या पोराप्रमाणें सुख दिलें. त्या राजाकरितां जर आह्मी असे वागलों नाहीं. तर आमच्यासारखे कृतघ्न कोणीच नाहीं. असें ह्मटल्यास चालेल छे. पण आपण तसें करावयाचें नाहीं. ज्यादिवशीं महाराजाचें दर्शन होईल तोच आमचा आनंदाचा दिवस. त्याशिवाय दुसरें सुखच नाहीं. केव्हांना केव्हां दृढनिश्चयाचें फळ सर्वेश्वर देईलच.

---

## प्रवेश ४ था.

( वीरसिंह व शूरसिंह प्रवेश करितात. )

**वीरसिंह०**—दादा ! आतां आपल्याला किती मौज वाटते आहे बाबानां तेवढीं फळें मिळवायला किती प्रयास पडले असतील.

**शूरसिंह०**—अरे आपल्या मुलांसाठीं कितो जरी संकटें सोसावीं लागलीं तरी पित्याला अगर मातेला त्याचा शीण वाटत नाहीं.

वीरसिंह०—दादा ! चल आपण या बागेंत घटकाभर फिरूं. कोणातरी श्रीमंताची ही बाग असावी. येथें किती मौज दिसते ही. ही पाहून मला तर—

पद. ( नृमांसखंड० )

मनास मोद वाटतो पहा किती तरी ॥ वहातसे किती सुमंद-
वायु हा तरी ॥ उद्यानभूमिका न खचित सत्य सुरपुरी ॥ नसे
मूळीं न न्यून येथ नाहीं इस सखी ॥ १ ॥

शूरसिंह०—आणि ही पाहिलीस का फुलझाडांच्या ताटव्याची रांग.—

पद. ( इसतनधन० )

परिमळ सुटला बहु पुष्पांचा ॥ जाई जुई बकुली मालतिचा ॥
दवणा मरवा पांच तसेची ॥ गुलाब फुलला नाना परिचा ॥१॥

विरसिंहा, चल आतां माघारे जाऊं.

वीरसिंह०—हें कायरे दादा ! याच्यापुढें किती तरी तऱ्हेचीं झाडें आहेत. कारंजीं पहा कशीं उडताहेत तीं ?

शूरसिंह०—छे हा नाद सोडून दे ! हें बघ—

पद. ( विपरीत० )

अनुकूल दैव अह्मां नाहीं ॥ जाऊं नको त्या उद्यानींही ॥ अ-
पणा दाविनि कोणी दरारा ॥ किंवा ओढितो कोणी फरारा ॥
नाद नको हा ही ॥ १ ॥

वीर०—चल तर खरा ! मग पाहूं कोण आपल्याला बोलतें आहे तें. ( पुढें जाऊं लागतों तों एक शिपायी प्रवेश करितो ).

शि०—ए अबे ! कुणाच्या परवानगीनें बागेंत चाललांत ! थांबा तुह्मांला आतां राजाकडे घेऊन जातों. विचारल्यावांचून बागेंत शिरून नासधूस करितां काय ?

शूर०—हें पहा शिपाईबुवा ! आह्मांला ठाऊक असून आह्मीं तुमच्या बागेंत शिरलों असें नाहीं. अह्मीं चुकून इकडे आलों. बाग सुरेख दिसला ह्मणून येथपर्यंत आलों. आंत जाण्यास प्रतिबंध असला तर आह्मीं परत जातों. मग तर हरकत नाहीं?

शिपाई०—तें कांहीं नाहीं. तुह्मांला राजाकडे नेऊन चांगली शिक्षाच दिली पाहिजे. तुह्मीं लबाड आहांत.

शूर०—तूं ह्मणत असशील तर ह्मण बिचारा. पण आह्मीं कांहीं तुमचा अपराध केला नाहीं.

शिपाई०—तें कांहीं नाहीं. सरकार मग वाटेल तसा न्याय करील माझ्या हातीं कांहीं नाहीं.

वीर०<br>शूर० } पण आह्मीं काय ह्मणतों तें ऐका-तरी-

शि०—छे ! छे ! नांवसुद्धां काढूं नका ! तसली गोष्ट मनांत सुद्धां आणूं नका. ( त्यांना घेऊन जातो. )

( राजा जयसिंग व पद्मिनी बसलीं आहेत.<br>असा पडदा उघडतो )

शि०—( मुजरा करून. ) सरकार ! ह्या दोन मुलांनीं बागेंत येऊन फार नासाडी केली ह्मणून यांना येथें हजर केले आहेत. मर्जी प्रमाणें करावें.

राजा०—बरें ! जा तूं आपल्या कामाला. ( शिपाईजा. ) बाळानों, तुमचीं नावें काय ?

वीर०—महाराज, माझ्या पित्यानें माझें नांव वीरसिंह असें ठेविलें आहे.

राणी०—असंकाय ! आणि तुझेरें काय बाळ नांव ?

शूर०—माझें नांव, माझें नांव शूरसिंह.

राजा०—ह्यांच्या बोलण्यावरून हीं कोणातरी थोराचीं मुलें असावींत असें अनुमान होतें. सखे पद्मिनी, तुला कसें वाटतें ?

पद्मिनी०—तें कांहीं निराळें सांगायला नको. खचित—

( पद. कटीं लंगोटा० )

**क्षात्र बीजाचा ॥ दिसतो हा छावा साचा ॥ धृ० ॥ बालरवी-सम सुरम्य कांती ॥ उपवनिं पडलि जणुं रविदीप्ती ॥ स्व-भाव यांचा ॥ वाटतो खचित गमतीचा ॥ १ ॥**

राजा०—बाळानों ! तुह्मीं भिऊं नका बरें, जसा आमचा दिलीप तसेच तुह्मीं अहांला! बाळानों, तुमच्या वडिलांचें नांव काय? आणि तुह्मीं एकटेच इकडे कोणिकडे ? तुमचीं मातापितरें कोठें आहेत. सर्व इत्थंभूत हकीगत सांगा बरें ? भिऊं नका.

पद. ( करम करमेर० )

**पिता कोण कोठील सांगा मला ॥ तुह्मीं अज्ञ बाळें या स्थळीं कां आला ॥ १ ॥ छळी कोणी तुह्मां जरी तें वदा ॥ करी शासनाशी नुरे आपदा ॥ २ ॥**

शूर०—महाराज, आपण मोठ्या प्रेमानें विचारतां त्यापेक्षां आह्मांला

आमची हकीगत सांगण्याला कांहीं वाईट वाटत नाहीं. चंदनावती नगरी आपल्याला ऐकून माहीत असेलच. तेथला राजा चंदन त्याचेच आह्मीं पुत्र ! पण महाराज काय सागूं.

पद. ( महाराजआज० )

**महाराज आज दीन बुडती दुःखसागरीं ॥ राज बालकें आह्मीं अशीं महीवरी ॥ चंदनावती पुरींत राज्य जो करी ॥ तोचि तात आमुचा सत्य भूवरी ॥ मलियागिरी जननी प्रेम बहुत ती करी ॥ दुर्दैवें बुडलों आह्मीं दुःखसागरीं ॥ १ ॥**

राजा०—बरें, आतां तुमचे आईबाप कुठे आहेत बरें ?

शूर०—महाराज ! इथून जवळच तें ठिकाण आहे.

राजा०—हैबति ! हे सांगतात त्याठिकाणीं जा यांचे आईबाप तिथें असतील त्यांना राजवाडयांत घेऊन या. बाळानों, तुह्मीं चला आमच्या बरोबर.

दिलीप०—आई, मला खेळायला, खोटी लढाई करायला, आयतेच खेळगडी झालेनाहीं?

पद्मि०—होय बरें बाळ.

राजा०—मुलानों, चला आमच्या बरोबर! कांहीं काळजी करूं नका. ईश्वरकृपेनें तुमचे दुःखाचे दिवस संपले असें समजा.

( जातात )

---

## प्र० ५ वा.

( पद्मिनी आणि मलियागिरी प्र. )

पद्मि०—मलियागिरी बाई, तुह्मीं आपल्या मनांत कांहीं संकोच

घरीत जाऊं नका ! हें घर आपलेंच आहे असें समजा ! तुह्मांला खचित सांगतें तुमचा आणि माझा देह मात्र निराळा बाकी प्राण एकच आहे बरें !

**मलिया०**—हें मला सांगायला का हवें ! तुमचा व माझा तसाच तुमच्या यजमानाचा व इकडचा संबंध का आहे, पण ईश्वरीसूत्र ह्मणूनच हा योग जुळून आला यांत कांहीं संदेह नाहीं. बरें पण दिलीप आणि वीरसिंह व शूर कुठे आहेत.

**पद्मि०**—ते कां तिकडे खेळत असतील. माझा, दिलीप उभयतां मुलांना सख्या भावापेक्षां देखील अधिक समजतो. त्याला एक क्षणभर सुद्धां त्यांच्यावाचून चैन पडत नाहीं. खरेंच ईश्वर त्यांच्या प्रेमाच अशीच वृद्धि करो.

**मलिया०**—आई जगदंबा काय करील तें खरें.

**पद्मिनी०**—बरें चला. आतां भोजनाची वेळ झाली. वेळेला दोन घांस खाल्ले ह्मणजे बरें.

**मलिया०**—पण बाळ कुठे आहेत ?

**पद्मि०**—त्यांना आणतें मी बोलावून. चला तुह्मी.

---

## प्र० ६ वा.

( शनि एकटाच प्रवेश करतो )

**शनि०**—( स्वगत ) ह्या चंदन राजाला इतक्यांत सुखाचा लेश देखील लागून उपयोगी नाहीं. आतां मी असें करितों कीं, चंदन राजा, त्याची

पत्नी, दिलीप, वीरसिंह व शूरसिंह असे निजले आहेत. तर जागच्या जागींच त्या जयसिंगाचा पुत्र दिलीप याला मूर्च्छित करितों. आणि गोरख वेषानें राजाला जाऊन सांगतों, ह्मणजे तो त्या त्रिवर्गास अतिभयंकर प्रायश्चित्त देईल. असो चला अगोदर त्या उद्योगाला लागलेंच पाहिजे.

( जातो. )

---

## प्रवेश ७ वा.

( जयसिंग व पद्मिनी बसलीं आहेत. )

**जयसिंग०**—प्रिये, ऊठ बरें, आपला बाळ दिलीप कुठें आहे? घात झाला ऊठ लौकर.

**पद्मि०**—हें काय ? झोंपेंत उठून असें भलभलतेंच काय बरळायचें तें. बाळ दिलीप तिकडे मल्लियागिरी बाईकडे निजला आहे.

**जय०**—छेग, निजला आहे कसला ! तो मरून पडला आहे. मला आतां एकानें येऊन सांगितलें.

**पद्मि०**—आतां मी इथें बसलें आहें मग कोण आला होता तो मला नाहीं दिसला कोठें ?

**जय०**—अग तुला दिसला नसेल ! पण मी ह्मणतों हें शब्दशः खरें आहे. कोण आहेरे ! नग्न तरवारी घ्या ! आणि दिलीप व चंदन राजा ज्या ठिकाणीं निद्रिस्त झाले आहेत तिकडे चला.

( जातात. )

---

## प्रवेश ८ वा.

( राजा चंदन, मलियागिरी, वीरसिंह, शूरसिंह निजले आहेत असें असतां जयसिंग राजा शिपाई लोकांसहवर्तमान प्रवेश करितो ).

जय०—( दिलीपाजवळ जाऊन. ) दिलीपा, बाळा दिलीपा ऊठ, अरे, असा काय अस्ताव्यस्त पडला आहेस. ( तो कांहींच बोलत नाहीं असें पाहून ) आतां मात्र खचित या दुष्टानें माझा गळा कापला. राजा, ऊठ. अरे पापकर्म करून तें छपविण्यासाठीं असें झोंपेचें मीष करतोस काय ?

( चंदन राजा व राणी सर्व उठतात. )

**चंदन०**—महाराजांनीं याठिकाणीं इतक्या रात्री येण्याची कां तसदी घेतली ?

**पद्मि०**—माझ्या बाळाचा नाश करून आणखीं काय मेला मानभाबीपणा दाखवितो आहे पहा ! ( दिलीपाजवळ जाऊन ) बाळा ! अरे या हतभागीला कसारे सोडून गेलास. अरे माझ्याबद्दल तुला कांहींच कारे वाटलें नाहीं. बाळा आतां मी बाळा ह्मणून कुणालारे हांक मारूं, आतां हा फुटलेला पान्हा मी कुणाच्यारे मुखांत घालूं. तुह्मीं पाहतां काय या चांडाळाचे माझ्यासमक्ष आधीं तुकडे करा पाहूं.

**चंदन०**—सरकार माझ्या हातून असा गुन्हा तरी काय झाला ? आणि आपण असे क्रोधाविष्ट कां झालांत.

**जयसिंग०**—राजा, अरे असे शब्द उच्चारायला तुझी जिव्हा वळते तरीकशी ? माझ्या बाळाचा खून करून आणखीं अशा मधुर भाषणानें त्याच्यावर विरजण घालतोस काय ?

चंदन०—सरकार ईश्वरसाक्ष सांगतों कीं, माझ्या हातून हें कृत्य झालें नाहीं.

मलिया०—पद्मिनीबाई, तुमच्या मनाला तरी असें इकडनें होईल असें वाटतें कां ?

शूर व वीर०—आमचा सोबती आह्मांला नकोसा कसा होईल.

पद्मिनी०—पुरे ! पुरे ! सर्वजण एकामाळेंतलेंच आहेत. ( रडून ) माझा बाळ मात्र मला नाहींसा झालागबाई !

जयसिं०—कोण आहेरे तिकडे ! मांगांना बोलवा आणि या त्रिवर्गांना आमच्या दृष्टी आड करा. ( चंदनास ) चंदना, तुझें चंदनच केलें असतें, पण तुझ्या कर्माचें प्रायश्चित्त भोगायला तुला असाच ठेवतों. ( मांगांस ) चला ! जारे यांना घेऊन. )

( राजा व पद्मिनी जातात )

चंदन०—सखे, मलियागिरी, प्रिय बाळानों, आपली कर्मरेषाच अशी, त्याला कोण काय करणार.

पद.

मजवरी न नव आलें संकट या वेळीं ॥ राहीलों जिवंत कशास गेलों कां नबळी ॥ दारासुत हे दुःखीं बुडती ॥ पाहतों मंदमती ॥ मना नच खेद मुळीं ॥ १ ॥ जगदीश रुष्ट जाहला॥ अह्मावरी या काळीं ॥ विधिलेखनतें नटळे ॥ कुणाही कधिं काळीं ॥ भोग आलिया सादर व्हावें संकट लादावें न प्रभुवरपदकमळीं ॥ २ ॥

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( शनि एकटाच प्रवेश करतो )

शनि०--( स्वगत ) वाहवा ! काय मौज झाली तरी ! जयसिंग राजाच्या प्रीतीला पात्र झालेला चंदनराजा पुनरपि स्त्रीपुत्रांसहवर्तमान वनवासी केला. असें जर केलें नाहीं तर मला कोणीच भजणार नाहीं. माझ्या विलक्षण सामर्थ्याचा प्रभाव प्रत्येक मानवीप्राण्याला असा समजून दिल्यामुळें माझी कोणी अवहेलना करणार नाहींच; परंतु कोणत्याही ग्रहदेवतेची अवहेलना करण्याचें त्यांच्या मनांतही येणार नाहीं. असो. या चंदन राजाचे अद्यापि नष्टग्रह संपले नाहींत. आतां मी असें करतों कीं, चंदन राजा स्त्रीपुत्रांसहवर्तमान असला तर त्याला कसलेंही दुःख वाटणार नाहीं, तरी त्यांत्रिवर्गांची परस्पर ताटातूट होईल असें केलें पाहिजे. ह्मणजे मग पहातों काय चमत्कार होतो तो.

---

## प्रवेश २ रा.

( राजा जयसिंग व राणी पद्मिनी अशीं बसलीं आहेत. )

राजा०--सखे पद्मिनी ! अग तूं काय शोक करीत बसली आहेस ! अग परमेश्वरानें ह्या ललाटीं जें लिहिलें असेल त्या प्रमाणें सर्व गोष्टी-घडून येत असतात.

पद्मिनी—प्राणनाथ ! तुह्मीं सांगतां तें मला समजतका नाहीं. पण

मीतरी काय करूं! पुत्रमोहासारखें प्रेम दुसरें कशांत येणार आहे, खरो-खर मागल्या जन्मीं मीच चांडाळणीनें कुणातरी पुत्रमातेची ताडातोड केली होती, म्हणूनच परमेश्वरानें रुष्ट होऊन त्यादुष्टाकडून माझ्या बाळाचे प्राण हरण करविले.

( इतक्यांत गुरुजी प्रवेश करतात. )

**गुरुजी०**—राजा! युवराजाचा त्या दुष्टचंदनें राजानें घात केला ही बातमी मला लागतांच माझी अगदीं बोबडी वळली, आणि एका क्षणाचा ही विलंब नकरितां इकडे आलों. ज्यादुष्टांनीं त्यांचा नाश केला त्याला देहान्त प्रायश्चित्तच योग्य आहे.

**राजा०**—महाराज! आपण म्हणतां तें असत्य आहे असें नाहीं; परंतु माझी मनदेवता त्या सत्वशील राजानें माझ्या पुत्राचा नाश केला असें सांगत नाहीं आणि म्हणूनच बुद्धिला वैर नसावें म्हणून मी त्याला आपल्या राज्या बाहेर हांकून दिला आहे.

**पद्मिनी०**—त्याला हांकून दिला म्हणून आपला बाळ थोडाच परत येणार आहे. देवा! माझें पाडस तूं कसें रे हिरावून नेलेस! आतां त्याच्या वांचून मी जीव तरी कसा ठेवूं! माझ्या मांडीवर आई आई करून आतां कोणरे बसेल! तुझ्या मनांतून जर असें करावयाचें होतें तर मला पुत्र दिलास तरी कशाला? मला नांवाची तेवढी आई म्हणून घ्यावयाला लावायचें होतेंना; बाळा, ऊठ! हा पहा स्तनांत किनाई दुग्धाचा पान्हा फुटला; बाळा, अरे या दीन मातेवर तूं असा कां बरें रागावलास. बाळा, मी तुला मांडीवर घेत नाहीं म्हणून कारे तूं बोलत नाहींस?

राजा०--हें पहा ! तुला वेडतर नाहींना लागलें ! या जगांतून जे जे एकदां नाहींसे झाले ते कधीं परत आले आहेत कां ?

पद्मिनी०—बाळा, खरेंचका रे तूं अतां मला दिसणार नाहींस ! माझ्याशीं एकशब्द सुद्धां कां बोलणार नाहींस ! लाडक्या ! असें नको-रे करूं. या मातेची तुला कांहीं तरी कींव येऊंदे बाळा, ऊठ, ऊठकिरे, असें कायचेंरे करावें.

( युवराज झोंपेंतून उठल्या सारखा उठून बसतो. )

युवराज०— ( उठून बसून ) आई ! हेंग काय ! तूं व बाबा अशीं स्वस्थ काय बसलांत ! बाबा तर एव्हांना दरबारांत सिंहासनावर बसून राज्यकारभार करीत बसायचे ( गुरुजीकडे पाहून ) आणखीं गुरुमहाराजही इकडे आले आहेत. आई, कशासाठींग अशीं तुम्हीं बसलांत ?

गुरु०—महाराज ! हा सर्व झालेला प्रकार पाहून मनाला अत्यंत आश्चर्य वाटतें. जों जों विचार करावा तों तों मती गुंग होऊन जाते. व कांहींएक सुचेनासें होतें.

राजा०—मी आपल्याला पूर्वींच सांगून ठेवलें होतें कीं, हा सर्व ग्रहांचा चमत्कार आहे. जरी त्या गोरखानें मला सांगितलें, तरी माझी कांहीं खात्री होत नव्हती असो !

त्याबद्दल सुख एवढेंच मानावयाचें कीं, आपण क्रोधवश होऊन त्या राजाचे प्राण हरण केले नाहींत. नाहीं तर ती राजहत्या माथीं बसावयाची. कोण आहेरे तिकडे. ( हुजऱ्यास ) अरे दिवाणजींना जाऊन अशी वर्दी द्या कीं, ईश्वरकृपेनें युवराज सजीव झाले, यासाठीं सर्व शहरभर हत्तीवरून साखर वाटा.

युवराज०—आई, मी सजीव झालों ह्मणून साखरा वाटावयाला सांगितल्या. ह्मणजे मला कायग झालें होतें ?

पद्मिनी०—बाळा काय सांगूं ? ती गोष्ट पुन्हां विचारूं सुद्धां नकोस.—

पद. ( फारदिलेहो० )

अंत जाहला ॥ तुझा प्राण हरपला ॥ ह्मणोनी जीव आमुचा न स्थीर राहिला ॥ दुःखनग भला ॥ अह्मांवरती पातला ॥ रुष्ट ईश जाहला न वाली राहिला ॥ शोकसागरीं ॥ महाजनसमूहहा ॥ बुडोनी जाय हाय हाय करित बैसला ॥ १ ॥

युवराज०—काय ह्मणतेस मी मृत झालों असें समजून तुह्मी दुःखांत पडला ? पण तुह्मांला असें वाटलें तरी कसें ! बरें पण आई ! माझे बाळमित्र वीरसिंह आणि शूरसिंह ग कुठे आहेत ?

पद्मिनी०—बाळा, ते काय तुला करायचे आहेत ! ते किनई आपल्या राज्यांतून गेले हो. ते आतां पुन्हा इकडे यावयाचे नाहींत.

युवराज०—आई, ते इकडे यायचे नाहींत ह्मणतेस तेंग कां ?

पद्मिनी०—त्यांना किनई हद्दपार केलें आहे !

युवराज०—काय ! माझ्या मित्रांना हद्दपार ! तें कोणी केलें ?

पद्मिनी०—अरे, तिकडच्या शिवाय दुसरें कोण करणार !

युवराज०—काय तातमहाराज ! माझ्या वीरसिंहाला आणि शूरसिंहाला तुह्मीं हद्दपार केलेंत ! मला नाहीं खरें वाटत हें.

जयसिंग०—बाळा, अरे तुला काय सांगूं.—

पद. ( थाटमाटसदनिं० )

एकाकीं मृत महालीं पावलासी तूं ॥ कारण नच कांहीं दिसे

मनिं ये ऐसा किंतू ॥ धृ० ॥ चंदननृप सुत राज्ञी समिप तव असे ॥ प्राण तयीं खचित हरण करुनियां असे ॥ स्तब्ध बैसले उगाच ये मनीं असें ॥ १ ॥

आणि ह्मणूनच त्या राजाला मी हद्दपार केला आहे.

युवराज०—बाबा ! तुमच्या हातून असें कृत्य सहसा घडणारें नाहीं. आतां मी आपल्याला सांगतों मला माझे मित्र आणून भेटवा. नाहीं-तर मी या स्थळीं राहणार नाहीं.

जयसिंग, पद्मिनी—असें काय बडबडतोस तें. हें पहा ! त्यांच्या शोधाला तर लोकांना पाठवून देतों. पण असें भलभलतें कांहीं बोलूं नको.

युवराज०—तात, माते, तें कांहीं मी ऐकणार नाहीं.—

साकी.

वीर शूर मन्मित्र जरी ते भेटतिना मजलागीं ॥ गरलपान, वा शास्त्रप्रहारें स्वप्राण हा त्यागीं ॥ निश्चय न ढळे हा ॥ असत्य आवडे न देहा ॥ १ ॥

जयसिंग, पद्मिनी—बरें तर आतांच दूतांना पाठवितों.

---

## प्रवेश ३ रा.

( चंदन राजा, मलियागिरी राणी, विरसिंह, व शूरसिंह प्रवेश करितात ).

चंदन०—( स्वगत.) " दैवी विचित्रा गतिः " असें जें एका ठिकाणीं ह्मटलें आहे तें कांहीं खोटें नव्हे. नाहीं तर, आह्मांला आज असें अरण्यांत कालक्रमण करणें कशाला भाग पडतें ! तरी, आमच्यावर परमेश्वराची

कृपाच समजावयाची, कारण माझ्या पुत्राचा घात केलास ह्मणून तुम्हां सर्वांनाच सुळावर चढवण्याची शिक्षा देतों; असें तो जयसिंग राजा ह्मणाला नाहीं. नाहीं तर, आह्मीं काय केलें असतें ! सारांश काय ? जसा काळ येईल तसें वागून संतोष मानला पाहिजे. असो पण आतां काय करावें. आज आह्मीं इतकीं सकाळपासून हिंडतों पण, आमच्या नजरेस गगनचुंबित वृक्षां शिवाय दुसरें कांहींच पडत नाहीं. असो. ह्या ठिकाणीं बसून ईश्वराचें प्रेमपुरस्सर स्तवन करावें ह्मणजे झालें.–

पद. ( हामायामोहपसारा० )

शिवशंकर गिरिजाकांता ॥ तुजविना अन्य नच त्राता ॥ तव पदीं ठेवितों माथां ॥ तूं तारक होसि पतितां ॥ जड विश्वाचा तूं कर्ता ॥ भव नाश होय तुज स्मरतां ॥ दीनासी त्वरें तूं तार ॥ करि परिहार ॥ सोडवीआतां ॥ तूंचि प्रभु तूंचि नियंता ॥ १ ॥

मलियागिरी०—प्राणनाथ, असे तुह्मीं काय हो स्वस्थ बसतां, या दीन झालेल्या बाळांकडे तरी पहा ! अन्नावांचून त्यांची काय दशा झाली आहे ती.

चंदन—प्रिये, अग त्यांची चिंता तुझ्याच मनाला वाटते आणि मला कांहींच वाटत नाहीं असेंका समजतेस तूं.—

पद. ( देवस्त्रीमेनका० )

शशिबिंबासम वदन तयांचें निस्तेज किं झालें ॥ कीं राहूनें ग्रहणसमयीं तें जणू गे ग्रासियलें ॥ धृ० ॥ अमोल्य वस्त्रा भरणें शोभती ज्या देहावरतीं ॥ पांडुरता बहु सांप्रत आली दीनदशा सुमती ॥ बघुनि तयांला हृदयविदारण होतें या कालीं ॥ ईशाधिन हें सकल ह्मणोनि वृत्ति पालटली ॥ १ ॥

हें पहा, अग परमेश्वर जसें ठेवील तसें राहिलें पाहिजे. असो. या झाडाखालीं बसून विश्रान्ति घ्या. वाटेच्या श्रमानें तूं देखीऊ फार श्रमित झाली आहेस.

**मलियागिरी**--वरं पण इथे जवळ कुठ पाणी सांपडेल का बरं?

**चंदन०**--तें मग मी पाहून येतों. तेथपर्यंत बरोबर कंद मुळें आहेत त्यांतलीं तूं बाळांना वाटून दे इतक्यांत मी येतोंच.

( चंदन राजा जातो. )

**वीर०**—आई, तूं आणि बाबा आमच्या करितां दुःख कशाला करितां, हें बग, आमच्या नशीवीं असेल तसें होईल!

**शूर०**—आई, दादा ह्मणतो तेंच खरें आणि शिवाय आपले गुरुजी कधीं कधीं सांगत नाहींत का कीं, सुखपहातां जवापाडे आणि दुःख पर्वता एवढें.

**मलिया०**—बाळानो! तुह्मीं असं बोलायला लागलात ह्मणजे माझीच दृष्ट तुह्मांला लागेल कीं काय, असं वाटतं. खरेंच तुमच्या सारखे धूर्त कोणीसुद्धां नसतील. बरं! आतां किनई तुह्मांला फार भूक लागली असेल तर, हीं फळें आहेत तीं खा ह्मणजे तुह्मांला बरं वाटेल.

**शूर०**—आई, तूं आमच्या विषयीं इतकी हळहळतेस मग हरिश्चंद्राचा पुत्र रोहिदास, त्यानें येवढे कष्ट तर दुःखद प्रसंग भोगले ते.

पद. ( कारेह्यारितूंमज० )

विपिनीं पाहुनीयां त्यांना ॥ मध्यान्हीवरि दिनकर आला ॥ अग्नि वनाप्रत लावीनां ॥ धड धड धड धड ज्वाळा उडती ॥ गगनाप्रति त्या सहजी पोंचती ॥ अष्ट दिशा तें धुंदंचि होती ॥ मार्ग न स्पष्ट दिसे नयना ॥ १ ॥ पादचारि तीं त्रिवर्ग जाती ॥ त्या को-

पिष्ठा बघवे नचतीं ॥ ह्मणूनि केली कापटचकृती ॥ विप्ररूपतसे घेउनि तो येई ॥ रक्षा मागे दाना ॥ २ ॥

आणि त्या वेळेस त्यांनीं काय केलें असेल;

मलियागिरी—बाळानो, खरंच तुह्मीं किनई खरे क्षत्रीय आहांत, नाहीं तर असलीं भाषणें तुमच्या मुखावाटे निघालींच नसतीं.

शूर०—आई, बाबा ग कुठे गेले ?

मलियागिरी—हें काय बाळ विचारतोस ?

शूर०—असें नको विचारूं, तर कायग विचारूं ?

मलिया०—ते किनई, जवळपास कुठे पाणी आहे का, ह्मणून पाहण्या-साठीं गेले आहेत.

वीर०—आई, ते केव्हांग परत येतील ?

मलिया०—अरे, येतील इतक्यांत, आपल्याला कांहीं सोडून जायचे नाहींत.

( इतक्यांत चंदन राजा येतो. )

चंदन०—प्रिये, बाळानो, हें घ्या पाणी, आणि प्या. प्रिये, आतां संध्याकाळचा समय अगदीं जवळ येत चालला. करितां आपण या-ठिकाणीं कांहीं राहून उपयोग नाहीं. येथून जवळच गांव असावा असें वाटतें ,कारण इथून जवळच एक नदी आहे तिच्या तीरीं चिरगुटें वगैरे धुण्यासाठीं बरेच चिरे पडलेले आहेत. शिवाय गाई, ह्मशी वगैरे श्वापदांची पावलें भिजलेल्या जमिनीवर रुतल्याचीं स्पष्ट दिसत आहेत, करितां चला.

मलिया०—पण प्राणनाथ, त्या नदींतून पैलतीरीं जाण्यास कांहीं साधन तरी आहे कां ?

चंदन०—साधन ह्मणशील तर कांहीं नाहीं. आणखी अशा वनवासांत तर आपणाला साधनें हवीं तीं मिळालीं तर ईश्वराची कृपा झाली असेंच समजलें पाहिजे !

मलिया०—बरं पण मग पार पडण्याची युक्ती तरी काय बरं योजली आहे ?

चंदन०—हें बग, मी वीराला व शूराला प्रथम खांद्यावर घेऊन नदींतून पोंहत जाऊन पैलतीराला ठेवतों आणि पुन्हा परत येऊन मग तशींच तुह्मांला घेऊन जाईन ह्मणजे झालें.

मलिया०—जशी आपली मर्जी. ( चंदन राजा वीरसिंहाला खांद्यावरून घेऊन जातो. )

मलियागि०—( चंदन राजा गेलासें पाहून ) काय बाई पाण्याचा तर घों घों घों असा शब्द येतो आहे हा ! मला तो शब्द ऐकूनच किती तरी भीती वाटते आहे. हे जलदेवते—

पद. ( उद्यां बघ जातें० )

कर जोडितें॥पार करि सुतनाथातें॥ होतां दर्शन तव प्राण्याला ॥
हरण करिसी तूं पापनगाला ॥ मुक्तमार्ग त्या सुलभ जाहला ॥
पतित जाती मग प्रभुपदकमला ॥ दीनदासीतें ॥ अक्षय दे
सौभाग्यातें ॥ १ ॥

बरें, पण ऐव्हानां ह्मटलं असतां प्राणनाथ परत यावेत. मग अजून कां बरं आले नाहींत. "परमेश्वरा तूंच माझें रक्षण कर" अग बाई ! घाबरल्या सारखे हे शब्द कोण बरें बोललें असावें. देवा, माझ्या प्राणनाथांची तर एकाद्या जळचरानें नाहीं ना बरी वाईट गती केली. तरी मी सांगत होतें कीं, पाण्यांत जाणें बरें नव्हे. याच्या पेक्षां आपण सर्व एका-

ठिकाणींच असून जो काय सोक्षमोक्ष व्हावयाचा असेल तो होईल ! देवा, कायरे या कपाळकरंटीवर हा प्रसंग आणलास ! मी आपण होऊन किरे माझ्या बाळांची आणि पतीची ताटातूट करून घेतली. कोण दुःष्ट चांडाळीण मी—

पद. ( नशिब फिरलें० )

गमत मजसी ॥ निष्फळ आलें मन्मासी ॥ सुख लेश न गवसे मजसी ॥ अनिवार दुःख मी सोशी ॥ पहा जगतासीं ॥ धृ० ॥ जिवलग मम नेला जलचरानीं हिरोनी ॥ प्रिय सुतद्वय माझे राहिले ये कुठोनि ॥ भेटती नापुढति मजसीं ॥ अगणित केलें पापासी ॥ भोगितें दशाही ऐशी ॥ १ ॥

खरेंच, अशा स्थितींत प्राण ठेवण्यापेक्षां आपण आपल्या हातांनींच आपला मोक्ष करून घ्यावा हेंच बरें. ( आपली वेणी सोडून केंसाचा गळ्यास फांस घालूं लागते. )

पद. ( जन्मा मी व्यर्थ अलें० )

पातक बहु करीं घडलें ॥ तें क्षमा करीं तूं प्रभुराया सगळें ॥ हाय ! हाय ! हाय ! हाय ॥ स्वपतिचरणीं नमन करुनी येतें आनंदें ॥ भेट पतिची होइना कीं वागूं स्वच्छंदें ॥ पतीराय ॥ तवपाय ॥ करुं काय ! हाय हाय ! भूवरिया अंतरलें ॥ १ ॥

( इतक्यांत दयासागर सौदागर प्र० करतो. )

दयासागर०—

पद. ( हां हां हां रविकुल० )

अविचाराधिन होऊनीयां गे काय करिसि अनुचित कृत्यातें ॥

स्वप्राणावरि उदार होउनि प्रवृत्त होसी निजघातातें ॥ इच्छा-
मात्रें स्थितिलय करितो चरित्र नकळे गे कोणातें ॥ सुख
दुःखाचा कर्ता हर्ता प्रभुवर कां न स्मरसि त्यातें ॥ दुःखाग्नीतें
तव विझवाया सिद्ध असे बघ या बंधूतें ॥ निष्कारण कां आत्म-
घात तूं करिसी सांग क्षणीं दासातें ॥ १ ॥

( तिचा हात धरितो. )

मलियागिरी०—हें पहा, तुह्मीं कांबरें माझ्या सुखाच्या आड येतां !

दयासागर०—भगिनी, आत्मघातांत सुख मानणारी तूंच एक मला दिसतेस. हें पहा, या असल्या विचारांना तूं अगदीं आपल्या अंतःकरणांतून काढून टाक बरें ! आणि माझ्या बरोबर माझ्या घरीं चल. मी तुला कांही कमी पडूं देणार नाहीं.

मलियागि०—बंधुराया, या पुढें तूं मला दुःख होऊं देणार नाहीस. पण हा वेळपर्यंत प्राप्त झालेल्या दुःखाचा मला कसा बरं विसर पडेल.

दयासागर०—तुझ्या तोंडची सर्व हकीगत मी ऐकली आहे. ईश्वर तुझ्या मना प्रमाणें केव्हांना केव्हां तरी घडून आणीलच.--

मलिया०—अशा आग्रहाला मी काय बरें उत्तर द्यावें.

दयासागर०—उत्तर दुसरं तिसरं कांहीं नको.—

साकी.

ईशदयेनें मनहेतू ते सिद्धीस जातिल ताई ॥ कृतकृत्याचा अ-
नुताप तुला मागुनि होईल पाहीं ॥ मानि वचन खरें ॥ पाठ-
विलें मज ईशवरें ॥ १ ॥

## प्रवेश ४ था.

( ह्मादा व येल्या प्रवेश करितात. )

ह्मादा०—कां येल्या, आजचा दिस कसा का हाई ?

येल्या०—त्ये काय इचरूं नगस बग. आज खाया पिया काय बी न्हाई ह्मना, पन आज योक राजबिंडा पुरुक्श एका माशाच्या प्वाटांतून निघालाय बगा !

ह्मादा०—थू. गाडीच्या. ह्येचका ! म्या ह्मतलं काय डूवाबोल्याची पेटी गवसलियाजनुं.

येल्या०—अर कसलें बी डबोलं घावलंय ह्मुन त्येका जन्मवर पुरत-या ? ह्यो मानुस तर पघा कसा हाय त्यो.

ह्मादा०—इक्त जे वर्नन करतुस त्ये दाव बगुं.

येल्या०—ह्ये बग ! प्वाटामंदि शिपलीभर अन्नाचा रसबी ग्येलेला न्हाई ह्मुन त्याच्यानें बसल्या जाग्यावरून उठवत बी न्हाई. त्यो आंतच बसला हाय तर चल तकड.

ह्मादा०—चल तर चल.—

( दोघेही जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

चंदन०—( आपल्याशीं ) अरे मला याठिकाणीं कोणी आणिलें, माझी प्रिया आणि बालक कुठे दिसत नाहींत. काहीं भूतचेष्टेचा प्रकार तर नसेलना. मी आपल्या पुत्रांना खांद्यावरून नदीच्या पैलतीराला ठेवून प्रियेला नेण्यासाठीं ह्मणून आलों; पण पहातों तों येथें प्रिया नाहीं;

तें खुणेचें झाडही नाहीं आणि कांहींच नाहीं. झालं ! आतां मात्र माझा सर्वस्वी घात झाला. मी आपल्या स्त्रीपुत्रांना मात्र खचित अंतरलों. परमेश्वरा, आतां आमचा अंत तरी किती पहाणार ?

( इतक्यांत झादा आणि येल्या येतो. )

**येल्या०**—झाद्या ! ह्यो पगितलास का ?

**झादा०**—( जवळ पाहून ) ए मानसा, तूं कोन हाइस.

**चंदन०**—बावांनों, मी कोण आहें हें मला ठाऊक आहे; पण तसा मी आहें कीं नाहीं, याचीमात्र तुह्मांला शंका वाटेल. पण बावानों तुह्मी रे कोण आहांत ?

**झादा०**—आह्मीं व्हय? मास मास खाऊ क्वाळी हाऊं पघा.

**चंदन०**—परमेश्वरा, काय बरं चमत्कार.—

पद. ( मजवरी हें आलें० )

अजवरी जें घडलें ॥ वृत्तमलातें ॥ कळुनियां चुकलें ॥ परी
आलों या स्थानीं कैसा गूढ महा हें मजला पडलें ॥ धृ० ॥
विचार बहु केला ॥ मानसीं परिही ॥ न सुचे कांहीं मला ॥
राहिली कवण्यास्थानीं भार्या सुतद्वय माझें प्रिय या वेळे ॥ १ ॥

**झादा०**—ह्यें बग मासे मारनार झतलं ह्मून भिऊं नगस. तुक्या अक्शी जिवास जीव देऊं बग.

**येल्या०**—पन अदुगर क्वान हाईस तें सांग.

**चंदन०**—( स्वगत. ) हे जर इतक्या कळकळीनें विचारताहेत तर यांना सांगावयाला काय हरकत आहे. हें पहा बावानों, तुह्मीं विचारतांच तर मी कोण आहें तें सांगतों. पण मी येथें कसा आलों तें तुह्मीं सांगितलें पाहिजे.

ह्मादा०—बरें घ्येस ! पन् तूं तर सांग. ?

चंदन०—ऐका तर.—

दिंडी.

चंदनावतिचा भूप असे जाण ॥ नाम चंदन मम वदति थोर सान ॥ एक छत्री मी राज्य भोग भोगीं ॥ परी आलो कुदशा ही या प्रसंगीं ॥ १ ॥

ह्मादा०—बरें पण राज्याची अशी स्थिति व्हायचें कारन.

चंदन०—अरे कारण कसलें. ग्रहदशा फिरली ह्मणून सर्वच पारडें फिरलें. मला माझे पुत्र व भार्या पुन्हां दिसतील का ? परमेश्वरा, असें छळून अंत पहाण्यापेक्षां एकदमच आपल्या पांयाशीं कां नेत नाहींस ?

ह्मादा०—ह्यें बगा सरकार, आपन काडी इतकीबी काळजी करूं न्हाई. आजपासून आह्मीं तुमच्या सेवाचाकरींत आपला दिस घालविनार बगा.

येल्या०—अन् ह्यें बगा महाराज, तुमचीं मुलें आणि अस्तुरीबी तूह्मांला लौकरच मिळत्याल बगा.

चंदन०—कशावरून ह्मणतां तुह्मी !

ह्मादा०—कशावरून जी काय ह्यें बग.—

लावणी–( मोटे तितके सम० )

इश्वामित्र रुषि कोपला हरिश्चंद्र राजाला ॥ राज्य सारें दान घ्येऊन पाठिवल वनित्याला त्याची रानी नाव जियेचें व्हतं तारामती ॥ अन् रोहिदास तो पुत्र तयाचा व्हाता सागांती ॥ दोनपारी वणवा लाविला छळिलें नानापरी ॥ हरिश्चंद्र काबाड कष्ट क-

रितो डोंबाघरीं ॥ ईश्वराची कुरपा झाली जव्हां का त्यावरी ॥ समद मिळून राज्याराम ते करीती या भूवरी ॥ १ ॥

चंदन०—पांचांमुखीं परमेश्वर असें ह्मणतात तेव्हां यांच्याच ह्मणण्याप्रमाणें होणार नाहीं कशावरून! ( उघड ) बरें बावानों, तुमच्या ह्मणण्याप्रमाणेंच करतों.

ह्मादा, येल्या०—आतां मातुर आमच्या मनासारं झालया खरं.

---

## प्र० ६ वा.

( स्थळ०—जंगलांत वीरसिंह एकटाच बसलेला. प्र. क. )

वीरसिंह०—काय करावें, आमच्या बाबाची आणि आमची ताटातूट झाल्यापासून आह्मांला या जगांत कोणीच वाली नाहीं असें झालें आहे. असो काय काय नशीबीं असेल तें तें भोगलें पाहिजे, भाऊरायाला पाणी आणण्याकरितां गेल्याला इतका विलंब लागला तरी अजून कां बरें आला नाहीं. माझे प्राण तर कसे व्याकूळ होताहेत. माझ्याच्यानें आतां बसवत देखील नाहीं तर, मी आतां येथेंच पडतों. भाऊराया आल्यावर मला उठवीलच. ( झाडाखालीं निजतो ).

( इतक्यांत शनिदेव प्रवेश करितो. )

शनिदेव०—( वीरसिंहास पाहून ) ठीक आहे. राणी व राजा यांची जशी ताडातुड झाली तशी या भावांची पण ताडातोड केली पाहिजे. आतां ही ताडातूड करण्यांत मात्र आपल्या मनांतला जो उद्देश आहे तो सोडतां कामानये. त्या चंदन राजाला मी आपला प्रताप बराच दाखविला आहे आणि त्यामुळें तो आतां अगदीं दीन झाला आहे. असो आतां या पोराला आपण उचलून दुसरीकडे न्यावा अथवा नको जाग-

च्या जागींच मोहिनी घालावी ह्मणजे झालें. तो पहा त्याचा भाऊ पाणी घेऊन मोठ्या लगबगीनें याच मार्गानें येतो आहे; तर आपण आपली कामगिरी अगदीं झटपट उडविली पाहिजे.---( शनिदेव जातो. )

शूर०---( प्रवेश क. ) माझा वीर तहानेनें अगदीं सुकून गेला असेल; तर त्याला हें पाणी द्यावें. ( उघड ) बाळा, ऊठ. आणि मी जल आणलें आहे हें प्राशन कर. ( वीरसिंह उठत नाहींसें पाहून ) बाळा, ऊठकिरे असें काय करितोस, अरे मी लौकर आलों नाहीं ह्मणून कारे तूं रागावलास, बाळा सांगकिरे ( हात चांचपून ) घात झाला. माझा एकुलताएक भाऊ काळानें ओढून नेला. आतां मी काय करूं.

पद. ( वसंतिं बघुनि० )

बंधो सोडुनियां मजला ॥ एकलाचि गेलासी कसा तूं वद पर-
लोकाला ॥ प्रेमें बाहूं कवणाला ॥ भूवरी आतां कोणी नुरला
जिवलग देहाला ॥ मुकलों माता जननीला ॥ परि आशा होती
तुज वरती तो कालही फिरला ॥ १ ॥

( इतक्यांत शनि गोरखवेषानें येतो )

शनि०-क्यों बेटा, तुम् कायके वास्ते रोताहे ! मैरेकु कहदे तो भला होजायगा.

शूर०---महाराज, काय सांगू माझा एकुलता एक भाऊ मी त्याला तृषा लागली ह्मणून उदक आणण्यासाठीं गेलों, आणि उदक घेऊन येथें येऊन पाहतों तों तो मृत होऊन पडला आहे.

गोरख०---ये देखो ! तुम अपने दिलकु कायकू तसदी देते हो ! जो ये जगमें आया है, उसकू कभीना कभी भगवत लेकर चलनेवाला है. अबी तुम शोक मतकरो. ये मृत शरीरकूं पहिले अंगार देना चाहिये.

शूर०---महाराज, हाच का आपण मला उपाय सांगणार.

गोरख०---ओतो सच. जिता आदमी था तो कुचबी इलाज चलेगा. अबी क्या करना ? तुं अबी देर मत्करो.

शूर०---( स्वगत ) असो. आतां दुःख करून उपयोग काय ? झाली गोष्ट कांहीं परत येत नाहीं. आतां एक दया आली तर त्या शनि महाराजानांच येवो कारण त्यांच्याच अवकृपेच्या योगानें आम्हांवर हा प्रसंग झाला आहे.

( शूरसिंह जातो. )

गोरख०---या मुलानें अज्ञान असून सुद्धां माझें स्मरण केलें आहे, त्या अर्थी यांच्यावर कृपाच केली पाहिजे.

(वीरसिंहाला जागृत करतो.)

वीरसिंह०---काय भाऊराया, उदक घेऊन आलास. ( गोरखास पाहून ) हें काय ! तुम्हीं कोण आणि माझा भाऊ कुठे आहे ?

गोरख०---कोण तुझा भाऊ ? आम्हांला कांहीं ठाऊक नाहीं.

वीरसिंह०---परमेश्वरा ! आतां मात्र दुःखाचा कळस झाला.

( मूर्च्छित होतो. )

गोरख०---बेटा, उठ सावधहो ! मी तुला सर्व हकीगत सांगतों. थोड्या वेळा पुर्वी याठिकाणीं एक बालक उदक घेऊन आला होता; परंतु तूं मूर्च्छित होऊन पडल्यामुळें गावांत जाऊन एकादा वैद्य आणण्यासाटीं तो गेला आहे. तो गेल्यानंतर मीच तुला सावध केलें. आतां तूं काडी मात्र काळजी करूं नको. आतां तुमचे दुःखाचे दिवस संपत आले असें समजा.

वीरसिंह०—महाराज मी आपणास वंदन करितों.

गोरख०—जा ! परमेश्वर तुझें कल्याण करो. बाळा, आणखी ही एक यष्टी माझा प्रसाद ह्मणून तुजजवळ ठेव. इच्यापासून जें आपल्या इच्छेस वाटेल तें कार्य साधतां येतें समजलास.

वीरसिंह०--महाराज, मी कोणत्या मार्गानें जाऊं.

गोरख०—जा अशा या समोरच्या मार्गानें.

(वीरसिंह जातो)

गोरख०—असो येथपर्यंत तर बराच प्रभाव त्या राजपुत्राला, राजाराणीला दाखविला; परंतु आतां त्याच्या राशीवरून माझें स्थान पालटणार ह्मणून मला त्यांना पूर्ववत सौख्यच दिलें पाहिजे. मी जेथपर्यंत सरळ आहें तेथपर्यंत. एकदां वक्र झालों ह्मणजे.

" द्वादशास्थानीं येइन त्यातें गांजिन सत्य तरीच शनीमी "

(हें पद्य ह्मणून निघून जातो)

---

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

(शूरसिंह एकटाच प्रवेश करतो)

शूरसिंह०—परमेश्वरा, अजूनही तूं आमचा अंत पहात आहेसना ! असा अंत पहाण्यापेक्षां एकदमच सोक्षमोक्ष केलेला बरा ! मी दहन विधीचें सर्व साहित्य त्याठिकाणीं घेऊन जातों तों त्या ठिकाणीं तें शवही नाहीं. काय त्याची स्थिति झाली असेल हरी जाणें. असो. परमेश्वर काय करील तें खरं यांतच आनंद मानून राहिलें पाहिजे. असो. आतां

ज्याच्याकडून हें साहित्य आणिलें त्याचें त्याला परत देऊन माझी हिऱ्याची आंगठी परत दिल्यास पहावी ह्मणजे असल्या संकटाच्यावेळीं तिचाही थोडा फार उपयोग होईल. चलातर तिकडेच जाऊं. पाहूं त्या शेटीची विनवणी करून वळला तर ठीकच. नाहींतर आपलें नशीब आणि आपण.

## प्रवेश २ रा.

( शनि एकटाच प्रवेश करतो. )

शनि०—माझ्या शक्तीचा प्रभाव चंदन राजाला दाखविलाच त्यालाहीं बरेंच दुःख झालें आहे तर तीं सर्व एकमेकांस भेटून पुनरपि सर्वत्र आनंदी आनंद होईल, असें केलें पाहिजे. त्यांची अशी स्थिति झाल्याबद्दल मला खुद्धां वाईट वाटतें. पण मी तरी काय करावें. स्वामींची आज्ञा प्रमाण मानली पाहिजे. नाहींतर त्यांच्या कोपाला पात्र व्हावें लागणार. असो जें झालें तें झालें आतां यापुढें मात्र त्या कुटुंबाला कोणत्याही प्रकारचें दुःख न होईल. अशी खबरदारी घ्यायची. ( जातो. )

## प्रवेश ३ रा.

( वीरसिंह एकटाच प्रवेश करतो. )

वीरसिंह०— पद.

मी होवोनि अनाथ फिरतों तारक ना दिसतो कोणी ॥ जनक जननीच्या भेटिस मुकलों. काय कथूं मम कहाणी ॥ बहु प्रियकर बंधु परी गेला सोडोनी ॥ दुर्भागी मी येई मग दया कोठोनी ॥ रानीं वनीं फीरें हाका मारी आक्रंदोनी ॥ १ ॥

प्रवासी०—ह्मणजे असें काय ह्मणतोस मुला ? तुझे आईबाप कुठे आहेत ?

वीर०—महाराज, तें आपल्याला काय सांगूं ! माझ्या आईबापाची आणि माझ्या बंधूची परमेश्वरानें ताटातूट केली. त्यांच्या शोधार्थ मी हिंडतों आहें; पण त्यांचा कोठेंच थांग नाहीं.

प्रवासी०—मग तूं चलतोस का माझ्याबरोबर ! दोन्ही वेळा खुशाल पंक्तीला जेवत जा आणि आनंदानें रहा.

वीर०—छे ! छे ! महाराज, आतां मला कांहीं नको. माझे प्राण लौकर जातील तितकें मला अधिक सुख आहे.

प्रवासी०—पण मी तुला तसलें भलतेंच कृत्य करूं देणार नाहीं.

वीर०—करूं देणार नाहीं ? ह्मणजे तूं माझ्यावर इतकी सत्ता चालवणार ती कशासाठीं.

प्रवासी०—कशासाठीं ह्मणजे तसाच कांहीं तुझा माझा संबंध आहे ह्मणून. ( मनांत ) मी याच्या वडिलांचा प्रधान आहें हें यानें कांहीं ओळखलें नाहीं, तर आपणही याला ओळख देऊं नये.

वीर०—काय ह्मणतोस ! तुं माझ्यावर सत्ता चालवशील अशी तुझ्या अंगीं धमक आहे ? तर हा पहा मी या वेताच्या छडीनेंच गळफांस घेतों.

प्र०—( छडी धरण्यास जातो. )

वीर०—हां ! छडीला हात लाऊं नकोस बरें का ! नाहीं तर संभाळून रहा कीं या मांत्रिक छडीनें कांहीं भलताच परिणाम होईल.

प्र०—काय ह्मणतोस ही छडी मंतरलेली आहे ?

वीर०—आहे ह्मणजे संशय आहे कीं काय? ही छडी माझ्या गुरूनें मला दिली आहे.

प्र०—तर मग या छडीच्या योगानें काय काय होतें तें सांग पाहूं!

वीर०—काय होतें तें सांगतों ऐका.—

पद. ( भरतासी राज्य० )

अंधासी नेत्र हो येती ॥ पंगू त्यापद फुटताती ॥ जरी कुष्ठ रोग पिडिताती ॥ परि सुतनु होय क्षणीं ती ॥ यष्टीचा प्रभाव ऐसा ॥ नकळे कोणा हा सहसा ॥ भूतादिक अन्य प्रकार ॥ होतिते पार ॥ सौख्य अनिवार ॥ होय जगांतीं ॥ किती त्याची नच हो गणती ॥ १ ॥

प्रवासी०—काय ह्मणतोस! याच्यापासून इतके विलक्षण प्रकार होतात. तर मग मी तुला सांगतों तें ऐक.

वीर०—तें काय?

प्रवासी०—हें पहा! माझ्या भाषणावर विश्वास ठेवलास तर खचित तुझें अकल्याण होणार नाहीं.

वीर०—असा काय कल्याणकारक उपाय तो सांगा तरी.

प्रवासी०—हें पहा या नगराचा राजा वृद्धावस्थेनें क्षीण झाला आहे, तेव्हां त्याचे नेत्र जो पुन्हां आणून देईल त्यास अर्धे राज्य मिळणार आहे. तर तुझ्या यष्टीच्या अंगीं जर असा विलक्षण चमत्कार असेल तर दाखीव.

वीर०—महाराज, चमत्कार आहे कीं नाहीं हें प्रत्यक्षच कळेल. पण त्या राज्याशीं मला काय कर्तव्य आहे?

**प्रवासी**—हें पहा ! तूं अद्याप अज्ञान आहेस. मी तुला सांगतों, जसा हा तुला राज्यप्राप्तीचा योग आला तसाच तुझ्या आईबापाच्या भेटीचाही योग येणार नाहीं असें कशावरून.

**वीर०**—असो तुह्मी ह्मणतां तर चला. यश देणार परमेश्वर समर्थ आहे.

पद. ( मनुजा भजरे० )

**तो प्रभु रमारमण भगवान ॥ सकल दुरित हर, भक्तवरद कर, माझा कैवारी ॥ धृ० ॥ जनकजननीचें दर्शन करवुनि पोंचवील मज सुखशिखरीं॥ हरिल सकल अंतरिची चिंता दुःसह झाली जी भारी ॥ १ ॥**

---

## प्रवेश ४ था.

( शूरसिंह ओटीवर निजला आहे असें असतां घेलाशेट प्रवेश करितो.

**घेलाशेट०**—( आपल्याशीं ) हा पोर माझ्यावर विश्वास ठेवून निजला आहे. पण याला जर असाच निजूं दिला तर सकाळीं उठल्यानंतर आपली अंगठी परत मागूं लागेल. तरी याला तसें करूं देतां उपयोगीं नाहीं. आतां याच्या खिशांत आपलीच अंगठी टाकतों आणि चोरी करून झोंपेचें मीष घेऊन पडला आहे अशी बोंब करतों ह्मणजे आपोआपच चावडीवर नेतील आणि आपली तुंबडी भरेल. काय बिलंदर पोर तरी ! मला ह्मणतो माझ्या भावाचें प्रेत कोणी नेलें तरी तुह्मीं आपलें सामान परत घ्या ! अरे सामान परत कशाला करितोस तें आतां तुझें तुझ्याच उपयोगीं पडायाला लावतों. ( आपल्या खिशांतील अंग-

ठी काढून त्याच्या खिशांत टाकतो ) अहो चोर हो चोर ! धांवा ! धांवा ! हा पहा पोर तिजोरी फोडून त्यांतून हिऱ्याची अंगठी वगैरे घेऊन पळतो आहे. पकडा, उठा. ( इतक्यांत शिपाई व कांहीं लोक धांवून येतात. )

शिपाई०—काय काय गडबड आहे ! काय झालें हो घेलाशेट.

घेला०—अहो काय सांगूं तुह्मांला शिपाईबुवा ! हा पोर गरीब ह्मणून मी त्याला रात्रीच्या रात्र वस्तीला जागा दिली पण हा निव्वळ चोर होता हें मला आतांच कळून आलें. वाहवारे उपकारी गृहस्थ ! अरे वरून चांगला सुंदर दिसतोस व विश्वासूक आहेस असें वाटतें, पण ही तुझी कृती पाहून माझ्या कल्पनेनें मला खास फशिवलें असें आतां वाटूं लागलें आहे ! अहो बघतां काय ओढा या चोराला.

पद. ( तातवचन० )

फर फर फर फर ओढुनि लौकर येथुनि न्यावें या चोरा ॥
मुसक्या बांधा झडकरी याच्या करील नातरी पोबारा ॥ काक
असे हा मोरचि बनला लावुनि त्याचा पीसारा ॥ यानें विश्वा-
सानें लुटिला ऐवज हो कीं मम सारा ॥

शूर०—तूं नीच असिसि बहु खोटा ॥ एकाकी होसी उलटा ॥
शिपाई०—तूंच रे तूंच बहु खोटा ॥ केलेंसी ऐसा कपटा ॥
घेलाशे०—तो नीच खरा ॥ नच कुणि दुसरा ॥ १ ॥

शूर०—शिपाईबुवा ! अहो तुह्मी याच्या भाषणावर काय विश्वास ठेवतां ! माझीच अंगठी यानें घेतली आहे ती मी मागेन ह्मणून यानें हें कुभांड काढलें आहे दुसरें कांहीं नाहीं.

घेला०—त्या पोराचें काय ऐकता हो ! तुह्मीं अगोदर त्याला चतुर्भुज करा. आणि चौकीवर न्या ! मग न्याय.

शिपायी०—चलरे चल- ( त्यास धक्के मारून घे० जा०)

---

## प्रवेश ५ वा.

( वैभवराज व सुमंत बसले आहेत. )

सुमंत०—

पद. ( नाहीं सुभद्रा० )

अगणित उपाय केले परी ते निष्फळकीं झाले ॥ थोर थोर धन्वंतरी अजवरि स्वस्थच्चि कीं बसले ॥ धृ० ॥ सार्वभौम नृप तीच्या दुःखा पाहुनियां सकला ॥ दुःख होतसे नसे मिती त्या वर्णवे न मजला ॥ मंत्रीसाधनी कुणी पंचाक्षरी अवनीवरी नुरला ॥ परमेशाचा कोप प्रजेवरी सत्यच्चिकीं झाला ॥ १ ॥

वैभव०—सुमंत, आतां इतक्या वृद्धापकाळीं असें दुःख करून काय करायचें आहे. माझे नेत्र तुह्मीं मंत्री आहांत बरें ! तेच आहांत तसेच असलां ह्मणजे माझ्या उज्वल कीर्तीला डाग लागलाच तर तो तुमच्या दिसण्यांत येईल.

( इतक्यांत कंचुकी प्र. क. )

कंचु०—महाराज, बाहेर एक सुमारें बारा वर्षांचा कुमार आला आहे ! तो आपल्यास नेत्र आणीन असें प्रतिज्ञेवर सांगतो आहे, करितां महाराजांनीं त्याचा अनुभव काय आहे तो पहावा अशी वीनंती आहे.

सु०—कंचुकी कोण आहे त्याला आंत घेऊन या.

( कंचुकी जातो व प्रवाशा सहवर्तमान वीरसिंहास घेऊन येतो. )

कंचु०--यावें ! असें याठिकाणीं बसावें.

सुमंत०—( वीरसिंहास ) आपलें वय अगदींच लहान असून ही अप्रतीम विद्या कुठे संपादन केली.

वीर०—हा सर्व ईश्वरी कृपेचा खेळ आहे. आपण अगोदर अनुभव घ्यावा ! मग सर्व सागतों.

सुमंत०—तुह्मीं या ठिकाणीं पुर्वी कधीं आला नाहीं असें वाटतें.

प्रवासी०—खरें आहे महाराज, या ठिकाणीं आह्मीं हे प्रथमच आलों आहों.

सुमंत०--तर मग तुह्मांला सांगतों तें ऐका—

साकी.

निज सामर्थ्यें नयन आणि जो पूर्वी परि नृपतीतें ॥ अर्ध राज्य लक्ष्मी त्या देई भूप स्वयें कीं त्यातें ॥ सुयश तुला येवो ॥ भूपती सुखी जगीं होवो ॥१॥

वीर०—ठीक आहे ! प्रयत्न करण्याचें काम माझें ( मनांत ) हे महासाधो, तुझ्या वचना प्रमाणें या यष्टीच्या परीक्षेची वेळ आली आहे तर तूंच माझी पाठ राख.

( काठी तीन वेळ राजाच्या मस्तकावरून फिरवतो व त्यास नेत्र येतात )

वैभव०—प्रधानजी, काय हो हा अद्भुत चमत्कार ! हा प्रत्यक्ष अश्विनीकुमारच माझ्या इथें चालून आला कीं काय असें वाटतें. प्रधानजी ! आपल्या वचना प्रमाणें याला आधीं अतांच्याच शुभमुहूर्तावर राज्याभिषेक करा.

पद. ( सुटला पितृदि० )

झाला ॥ अनंद भारी स्वमना ॥ वर्णन त्याचें मज करवेना ॥ केले यत्न अजवरी नाना ॥ परी चीज न होउनि गेले ते निर्फळना ॥ आतां चालुनि देवचि घरीं ॥ याची वर्णूं कीती मी थोरी ॥ साह्य भक्तकैवारी ॥ सुयश लभेना ॥ १ ॥

सुमं०—दिवाणजी, सर्व शहरांत हत्तीवरून साखर वांटा ! कारण असा योग कधींच आला नसता.

दि०—ठीक आहे आज्ञेप्रमाणें करितों.

वैभव०—

साकी.

मंगलस्नाना घालुनि यातें महावस्त्र परिधाना ॥ देउनि अभिमंत्रण करवावें यासी राज्यस्थाना ॥ योग्य बहु आहे ॥ दुसरा विचार मनिं नोहे ॥ १ ॥

सर्व जातात.

---

## प्रवेश ६ वा.

( शूरसिंहास शिपाई घेऊन येतात. )

शिपाई०—चल, ए पोरा, पाय उचल ! अतां कां रडतोस. करणी करितां न भी कोणा मग दिसे बापुडवाणा ! चेहरा बघा कसा दिसतो आहे तो.

शूरसिंह०—( मनांत ) बोला ! मनाला वाटेल तें बोला प्रसंग आला खरा, मग डगमगून काय उपयोग ?

पद. ( या विरहा कां भीसी० )

**अपराधी मज केला ॥ सारासार विचार न यांला ॥ अन्यायानें गांजिती मजला ॥ वाग्बाणें हृदयाला ॥ १ ॥ बद्ध करोनी नेती सांप्रत न्यायसभे वदण्याला ॥ २ ॥ काय असे मम दैवगती ही चित्रकथा जगपाला ॥ ३ ॥**

असो, काय होईल तें होवो, प्रसगं येऊं नये आलाखरा-यांतून पार पाडणार परमेश्वरा शिवाय कोणी नाहीं. देवा, खऱ्याचा वाली या जगांत कोणीच कारे उरला नाहीं; सारा असल्या लुच्चया लोकांचाच बाजारना ! असो काय व्हावयाचें असेल तें होवो. माझे आई बाप, गण गोत सर्व कांहीं तूंच आहेस.

शिपाई०—अरे ए, चल आटप उगीच काय वटवट चालवली आहेस ! तूंच काय तो एक खरा आणि बाकीचे सारे लुच्चे काय ? बरें पाहनों कीं आतां कितपत खरेपणा आहे तो.

---

## प्रवेश ७ वा.

( वीरसिंह, दिवाणजी, वकील, कारकून, शिरस्तेदार वगैरे बसले आहेत )

वीरसिंह—शिरस्तेदार, आज नवीन फिर्यादी काय असतील त्या पुढें आणा.

शिर०—शिपाई, फिर्यादीस पुकार ?

शिपाई—( न्यायकचेरीच्या, बाहेर जाऊन ) कोणी अर्जदार आहे ! अर्जदार.

घेलाशेट०—आहे. मी अर्जदार आहें.

शिपाई०—चल तर मग आंत हो.

शिरस्ते०—काय तुह्मीं फिर्यादी आहांत?

घेलाशे०—होय! मीच फिर्यादी आहें.

शिरस्ते०—तुमच्यातर्फे कुणी वकील आहे?

घेला०—नाहीं. आमचा खटला झाला तेव्हां त्याठिकाणीं वकील नव्हता.

शिरस्ते०—अहो, तसें नव्हे. तुह्मी आपली तक्रार सांगण्यास योग्य असा कोणी माणूस पाहिला आहे का?

घेलाशेट०—ह्मणजे! आमच्यांत काय प्रकार घडला हें मी जसें सांगेन तस दुसऱ्यास सांगतां येणार नाहीं सबब वकीलाच्या फीच्या पेंचांत मी पडलों नाहीं. सर्व हकीकत हुजूराच्या नजरेस आणण्यास माझा मीच तयार आहें.

शिरस्ते०—ठीक आहे. ह्मणा! ईश्वरसाक्ष खरें सांगेन.

घेलाशेट०—ईश्वर साक्ष स्मरून होतां होईसतोपर्यंत खरें सांगेन खोटें सांगणार नाहीं.

वीरसिंह०—हं आतां तुमची काय फिर्याद आहे बोला.

शिरस्ते०—तुमचें नांव काय?

घेलाशेट०—घेलाशेट.

शिरस्ते०—तुमच्या बापाचें नांव काय?

घेलाशेट०—दिवाळ शेट.

शिरस्ते०—धंदा काय?

घेलाशेट०—पोट भरण्याचा.

शिरस्ते०—ह्मणजे काय? लोकांचे खिसे कातरून पोट भरावयाचा कीं काय?

घेला०—नाहीं. तसें नाहीं. दुकानदारीचा.

शिरस्ते०—काय तुमची फिर्याद आहे बोला. बरें पण तुमचे आरोपी हजर आहेत?

घेला०—आहेत.

शि०—शिपाय आरोपीस बोलाव!

(शिपायि जातो शूरसिंहास घेऊन येतो.)

शिर०—हाच का तुमचा आरोपी?

घेला०—होय.

शिर०—तुमची काय फिर्याद आहे सांगा पाहूं.

घेला०—सरकार! फिर्याद ह्मणून इतकीच, हा पोर काल संध्याकाळीं आमच्या दुकांनीं आला व गयावया करून रात्रभर वस्तीस जागा देण्याविषयीं विचारूं लागला. मी याच्या गरीब मुद्रेवरून हा खरोखरीच तसा असेल असें समजून त्यास थारा दिला. पण त्यानें त्या उपकाराचें स्मरण न ठेवितां रात्रीं आह्मीं सर्व झोंपी गेल्यानंतर तिजोरी फोडली आणि त्यांतील कांहीं जिनसा घेऊन पळून जात होता. इतक्यांत मी जागा झाल्याची चाहूल ऐकतांच जागच्या जागींच झोंपेचें मीष करून पडला. तेव्हां मी माझ्या तिजोरिच्या चाव्या नित्याच्या ठिकाणीं नाहींत असें पाहून त्याच्याजवळ आलों तों त्याजपाशीं ह्या चाव्या सांपडल्या व ही हिऱ्याची अंगठी सांपडली ही पहावी!

शिर०—ही अंगठी तुझीच आहे अशाबद्दल कांहीं पुरावा आहे.

घेला०—ही माझीच अंगठी ! आणखीं त्याला दुसरा पुरावा तो काय पाहिजे.

शिर०—ते कांहीं नाहीं. पुराव्यानें सिद्ध केल्याशिवाय तुझ्या अर्जाकडे लक्ष देतां येत नाहीं. ( आरोपीस ) ही अंगठी तुझी आहे?

शूर०—होय सरकार ! ती माझीच आहे !

घेला०—पण शिरस्तेदार साहेब ! तुह्मीं त्याला असें विचारा कीं, ही अंगठी चोरल्याशिवाय तुझ्याजवळ आली कोठून ?

शिर०—तुह्मांला मधें बोलायाचें कारण ? न्यायासनाच्या नजरेस येईल त्याप्रमाणें करील ( आरोपीस ) ही अंगठी तुझीच आहे याबद्दल पुरावा कांहीं आहे?

शूर०—सरकार ! पुरावा ह्मणाल तर सत्यतेपेक्षां कांहीं नाहीं. मी सांगतों या गोष्टीकडे जर आपण अवधान द्याल तर या खटल्यांत कितपत खरेपणा आहे हें आपल्या सहज नजरेस येईल.

वीरसिंह०—( आपल्याशीं ) हा मुलगा वयानें लहान असून एखाद्या विद्वान पंडितासारखें भाषण करितो आहे; शिवाय याच्या मुद्रेवरून पाहिलें असतां हें कृत्य याच्या हातून घडलें असेल असें संभवत नाहीं. असो अखेर काय निकाल होतो तो पहावा. ( शि०दारास ) शिरस्तेदार, आरोपीची सर्व हकीगत लिहून घ्या.

शिर०—ठीक आहे. ( शूरसिंहास ) काय तुझी हकीकत आहे ती सांग पाहूं.

शूर०—( आपल्या जवळून कागद काढून त्याजपुढें टाकतो. )

शिरस्ते०—( वाचून ) काय ? याची ही हकीगत खरी आहे. तर मग आमचे महाराज कधीं कधीं आपल्या बंधूच्या संबंधानें जी हकी-

कत सांगतात त्याचा आणि ह्याचा मेळ बसतो. तर त्यांनाच कागद दाखवावे ह्मणजे झालें.

वीर०--( शि०दारास ) कां शिरस्तेदार ! स्वस्थसे !

शि०—महाराज, मोठा चमत्कार वाटतो आहे. हे कागद पहावे काय जगदीशकृपा असेल ती खरी.

वीर०—( कागद वाचून ) अरे हा तर माझा भाऊ ! आतां माझा भाऊ आणि माझ्यासमक्ष कैद्याच्या पिंजऱ्यांत ( शूरसिंहास जाऊन घट्ट मिठी मारतो.

घेला०--अरे बापरे ! हें काय लचांड झालें ! त्या पोरानें कागद पुढें काढून टाकला काय आणि हे एकमेकांस भेटतात काय ? आतां मात्र आमची गच्छंतीची पाळी आली.

वीरसिंह०—कोण आहेरे, याच्या अगोदर मुसक्या बांधा.

पद. ( झंपा० )

चला घेउनी अधम हा बंदिं घाला ॥ नीच खल हा असे सत्य महिला ॥धृ०॥ अन्नपाणी न द्या झुरत ठेवा सदां ॥ हाल करुनी मुखीं धूळ चोंदा ॥ द्रव्य लोभें करी दुःष्कृती मठ्ठहा ॥ शृंखला हस्तिं पायींच ठोका ॥ १ ॥

( घेलाशेटीस घेऊन जातात. )

वीरसिंह०—बाळा शूरसिंहा ! ईश्वरकृपेनेंच तुझी माझी भेट झाली, पण आपले बाबा आणि आई कुठे बरें असतील.

शूरसिंह०—ईश्वर करील तर त्यांची आमची ही भेट होईल.

( इतक्यांत दोघे कोळी व चंदन राजा येतात. )

कोळी०—सरकार, ह्यो मानूस आमाला यका माश्याच्या प्वाटा-मंदीं गवासला, आज पातूर आह्मीं याचें कसबी रकूशन केलें पन् आतां दिसान् दीस आमचा धंदा बी चालत न्हाई. तवा सरकारच्या म्होर ठेवावा ह्मून आलोंय.

शिरस्ते०—( आपल्याशीं ) काय ! हे तर आमचे महाराज ! पण यांच्यावर असा प्रसंग कशानें आला ( जाऊन घट्ट पाय धरतो ).

वीर०—} शिरस्तेदार ! हें काय तुह्मांला भ्रम झाला कीं काय ? त्याच्या पायां
शूर०—} काय पडतां ?

शिरस्ते०—महाराज ! आपण नीट पहा ! ह्मणजे मी करितों हें कांहींच नव्हे असें तुह्मांला वाटेल.

वीर०—} ( निरखून पहातात ) अरे ! हे तर आमचे बाबा.
शूर०—}

पद. ( मजवरी तरु० )

चरणि लीन बालक हे होती ये क्षणीं ॥ आशिर्वच द्या आह्मां
सु-फल होउनीं ॥ दैवयोग येईना कधिंही नुमजुनी ॥
अवचित हा योग जुळे प्रभु कृपे जनीं ॥ १ ॥

चंदन—बाळानों, उठा आतां. सर्व संकटें एका मागून एक सहजच नाहींशीं होतील. पण अगोदर या कोळ्याची कांहीं तरी योग्य बरदास्त ठेव.

वीर०—कोण आहेरे.

शिपाई०—जी सरकार काय हुकूम.

वीर०—दिवाणजीकडे जा आणि यांची योग्य बरदास्त ठेवायला सांग.

कत सांगतात त्याचा आणि ह्याचा मेळ बसतो. तर त्यांनाच कागद दाखवावे ह्मणजे झालें.

वीर०--( शि०दारास ) कां शिरस्तेदार ! स्वस्थसे !

शि०—महाराज, मोठा चमत्कार वाटतो आहे. हे कागद पहावे काय जगदीशकृपा असेल ती खरी.

वीर०—( कागद वाचून ) अरे हा तर माझा भाऊ ! आतां माझा भाऊ आणि माझ्यासमक्ष कैद्याच्या पिंजऱ्यांत ( शूरसिंहास जाऊन घट्ट मिठी मारतो.

घेला०--अरे बापरे ! हें काय लचांड झालें ! त्या पोरानें कागद पुढें काढून टाकला काय आणि हे एकमेकांस भेटतात काय ? आतां मात्र आमची गच्छंतीची पाळी आली.

वीरसिंह०—कोण आहेरे, याच्या अगोदर मुसक्या बांधा.

पद. ( झंपा० )

चला घेउनी अधम हा बंदिं घाला ॥ नीच खल हा असे सत्य महिला ॥धृ०॥ अन्नपाणी न द्या झुरत ठेवा सदां ॥ हाल करुनी मुखीं धूळ चोंदा ॥ द्रव्य लोभें करी दुःष्टकृती मठ्ठहा ॥ शृंखला हस्तिं पायींच ठोका ॥ १ ॥

( घेलाशेटीस घेऊन जातात. )

वीरसिंह०—बाळा शूरसिंहा ! ईश्वरकृपेनेंच तुझी माझी भेट झाली, पण आपले बाबा आणि आई कुठे बरें असतील.

शूरसिंह०—ईश्वर करील तर त्यांची आमची ही भेट होईल.

( इतक्यांत दोघे कोळी व चंदन राजा येतात. )

कोळी०—सरकार, ह्यो मानूस आमाला यका माश्याच्या प्वाटामंदीं गवासला, आज पातूर आह्मीं याचें कसबी रकूशन केलें पन् आतां दिसान् दीस आमचा धंदा बी चालत न्हाई. तवा सरकारच्या म्होर ठेवावा ह्मून आलोंय.

शिरस्ते०—( आपल्याशीं ) काय ! हे तर आमचे महाराज ! पण यांच्यावर असा प्रसंग कशानें आला ( जाऊन घट्ट पाय धरतो ).

वीर०— } शिरस्तेदार ! हें काय तुह्मांला भ्रम झाला कीं काय ? त्याच्या पायां
शूर०— } काय पडतां ?

शिरस्ते०—महाराज ! आपण नीट पहा ! ह्मणजे मी करितों हें कांहींच नव्हे असें तुह्मांला वाटेल.

वीर०— }
शूर०— } ( निरखून पहातात ) अरे ! हे तर आमचे बाबा.

पद. ( मजवरी तरु० )

चरणि लीन बालक हे होती ये क्षणीं ॥ आशिर्वच द्या आह्मां
सु-फल होउनीं ॥ दैवयोग येईना कधिंही नुमजुनी ॥
अवचित हा योग जुळे प्रभु कृपे जनीं ॥ १ ॥

चंदन—बाळानों, उठा आतां. सर्व संकटें एका मागून एक सहजच नाहींशीं होतील. पण अगोदर या कोळ्याची कांहीं तरी योग्य बरदास्त ठेव.

वीर०—कोण आहेरे.

शिपाई०—जी सरकार काय हुकूम.

वीर०—दिवाणजीकडे जा आणि यांची योग्य बरदास्त ठेवायला सांग.

शिपाई०-(जशी आज्ञा. " चलारे बाबानों" कोळ्यांस घेऊन जातो )

शिपाई०--सरकार ! बाहेर कोणी एक अर्जदार कांहीं महत्त्वाच्या व जरूरीच्या कामाचा अर्ज घेऊन उभा आहे.

वीर०--त्याला आंत घेऊन ये.

( शिपाई जातो व दयासागर सौदागरास घेऊन येतो )

सौ०—सरकार, माझी पायांशीं एवढीच विनंती आहे कीं, मी मागें व्यापारासाठीं दूरदेशीं गेलों होतों, तेव्हां व्यापाराच्या संबंधाचीं सर्व कामें आटपून नगराकडे परत येत असतां एक स्त्री आत्मघात करून घेतांना पाहिली. ह्मणून तिच्याजवळ जाऊन तिचें समाधान केलें आणि धर्मभगिनी प्रमाणें मानून मीं आजपर्यंत सरकारच्या कृपेनें पालन केलें. पण तिच्या मनांतला चिंतारोग अधिकाधिक बळावत जाऊन अगदीं अत्यावस्थ स्थिति झाली आहे. मज गरिबावर अनर्थ येऊं नये ह्मणून विनंती करण्यास्तव आलों आहें.

वीर०—काय ह्मणतोस अनाथ स्त्री ! तिला राजवाड्यांत आणवा पाहूं ?

दया०—ठीक आहे सरकार, मी स्वतःच जातों. त्याशिवाय ती इतरां जवळ भाषणही करणार नाहीं.

( दयासागर जातो. )

वीर०—कोण बरें ती स्त्री असावी ! त्या स्त्रीची हकीकत ऐकून माझें अंतःकरण असें सद्गदित कां झालें. ईश्वराचा नेमानेम काय आहे कांहीं समजत नाहीं. ( इतक्यांत मलियागिरी राणीचा मेणा आणतात. )

वीर०-} ( मेण्याजवळ जाऊन ) अहाहा ! आतां मात्र आनंदाचा क-
शूर०-} ळस झाला. मातृचरणाचे दर्शनानें आह्मीं अगदीं पुनित झालों. आई, उठ अग असें काय करतेस !

मलियागिरी०—बंधुराया, माझे प्राणपती तसेच वीरसिंह व शूर-सिंह मला नाहींना भेटत. बाळानों, तुझीं गेलातनां या अभागीला सोडून! बरें मीही येतें तुमच्या भेटीला.

वीर०—} आई, अग असें काय करतेस! सावध हो हे पहा आह्मी
शूर०—} दोघे जण तुझे पुत्र तुझ्या उशाशींच बसलों आहों. छे! ही काहीं आतां सावध होत नाहीं, तर आपण तरी कशाला प्राण ठेवा. हें शिरकमलच तिला वहावें ह्मणजे झालें.

पद. ( प्रिय शिरकमल० )

महिवरी न दुजें ॥ दैवत साजे ॥ मातृदेवते समान उमजे ॥
व्यर्थ कशास्तव धीर धरुनियां वागसि प्राणा श्री हरिभजरे ॥
क्षणैक हें सुख जाईल वायां अक्षयसुखहो प्रभुपायींरे ॥ १ ॥

( असें ह्मणून तलवार मारून घेऊं लागतो ).

शनि०— पद.

हां हां नृपाला ॥ अघटित कृतीला ॥ करिशी कशाला ॥ वृथा तूं ॥ राही सुखानें ॥ युतवैभवानें ॥ अससी जगांत धन्य ॥ तो काल गेला ॥ आजी लयाला ॥ चिर सौख्य भोगी ॥ जगांतरीं ॥ माझी कृपा होय ॥ दुःखासी ना होय करीना हाय हाय ॥ राया जगीं ॥ १ ॥

( शनि राजाचे हात धरतो. ) वीरसिंहा, अरे हें काय असलें आरंभलें आहेस.

वीर०—महाराज, मातृदैवतापेक्षां अन्य दैवतें मला तुच्छ आहेत.

शनि०—एवढेंचना मी तुझें मातृदैवत उठवितों मग तर झालें. ( अंगारा लावतो मलयागिरीस उठवतो. )

**मलिया०**—बाळा, मला एकदां कडकडून भेट दे बरें. ( एकमेकांस भेटतात. )

**चंदन०**—प्रिये, बाळानों, आपल्याला सर्व संकटांतून पार पाडणारी ही मूर्ती. तेव्हां सर्वांनीं मिळून प्रथमतः याचेंच वंदन करूं.

( सर्व शनिदेवास नमस्कार करितात. )

**शनि०**--तुमचें कल्याण असो ! राजा तुझ्या बाराव्या स्थानीं मी होतों ह्मणून तुझे इतके हाल झाले. आतां यापुढें तुझ्या केंसालाही धक्का लागणार नाहीं, आतां तुझी काय इच्छा आहे.

**चंदन०**—महाराज दुसरी काय इच्छा असावयाची ? देणें असेल तर हें भरत वाक्य असो.

पद.

**दुःखलेश कालत्रयीं कुणासही नसो ॥ सकलप्रजा चिरसुखांत सर्वदा असो ॥ निजधर्मावरी प्रीति, जन जनीं वसो ॥ प्रभुपद? कमलीं अक्षय मनभृंग हा वसो ॥ १ ॥**

**शनि**—तथास्तु ! तथास्तु !! तथास्तु !!!

## ईशस्तवन.

पद. ( ब्यांडच्या चालीवर. )

**रघुकुळ टिळका जगन्नायका शरण असे हा तवपाया ॥**
**लोभिं गुंतलों तुज अंतरलों सांपडलों भवविपिनीं या ॥**
**भक्तपालका ॥ रावणांतका ॥**
**पुरवि कामुका ॥ विनंती आयका ॥**
**ने चरणीं । उद्धरुनी ॥ " जगन्नाथ " नूं भवतरणी ॥ १ ॥**

**समाप्त.**